पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७३ ■ मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# अखेर भाजप–राष्ट्रवादीचा सूर जुळला !

- महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम
- भाजपला ६६ तर राष्ट्रवादी (अजित पवार) १४ जागा निश्चित

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) व शिंदेसेना यांच्यात गेल्या दहा दिवसांपासून सुरु असलेल्या वाटाघाटींचा गुंता सोमवारी उशिरा रात्री सुटला आहे. भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात जागा वाटपावर एकमत झाले असले, तरी शिंदेसेनेसोबत मात्र चर्चा फिस्कटल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे भाजप-राष्ट्रवादी युती पक्की झाली असून, भाजप ६६ तर राष्ट्रवादी अजित पवार १४ जागांवर लढण्याचे जवळपास निश्चित झाले आहे . तर शिंदे सेना स्वतंत्र



लढण्याच्या मनस्थितीत आहे.

भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार) तील युतीची अधिकृत घोषणा राज्यमंत्री इंद्रनील नाईक व भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी सोमवारी रात्री उशिरा घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत केली. या पत्रकार परिषदेला तसेच तत्पूर्वी झालेल्या बैठकीला राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आ. रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, आ. अमोल मिटकरी, राष्ट्रवादी (अजित पवार) चे महानगराध्यक्ष विजय देशमुख, भाजपचे निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल, महानगराध्यक्ष जयंत मसने, मदन भरगड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. भाजप-राष्ट्रवादी युती जाहीर झाल्याने अकोला महापालिका निवडणुकीचे राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे.

### भाजप-राष्ट्रवादीचे एकमत; जागा वाटपावर शिक्कामोर्तब

निवडणूक जाहीर झाल्यापासून सुरू असलेल्या युतीच्या चर्चेनुसार सोमवारी रात्री उशिरापर्यंत वाटाघाटी सुरू होत्या. दोन्ही पक्षांचे एकमत झाल्यानंतर भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या जागा वाटपावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप ६६ जागांवर, तर राष्ट्रवादी (अजित पवार) १४ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

◆ भाजपसोबत युती झाली असून, राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष १४ जागांवर महापालिका निवडणूक लढणार आहे. महायुतीचे घटक पक्ष म्हणून एकत्रित लढत महापालिकेत सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.
**विजय देशमुख** महानगराध्यक्ष, राष्ट्रवादी (अजित पवार)

◆ भाजप शिंदेसेनेसोबत युती करण्यास सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. त्यांनी प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे २० जागांचा प्रस्ताव दिला असून, भाजपकडून १४ जागांवर सहमती दर्शविली आहे. यामध्ये दोन जागा कमी जास्त करण्यास आम्ही तयार आहोत.
**विजय अग्रवाल,** निवडणूक प्रमुख भाजप

### शिंदेसेनेसोबतची चर्चा फिस्कटली!

अकोला महानगरपालिकेतील २० प्रभागातील एकूण ८० जागांसाठी ही युती जाहीर करण्यात आली. २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपचे ४८, राष्ट्रवादीचे ५ तर शिवसेनेचे ८ नगरसेवक निवडून आले होते. एकूण ६१ जागावर या तिन्ही पक्षांचे वर्चस्व होते. उर्वरित १९ जागांच्या वाटपावरून तीनही पक्षांत चर्चा सुरू होती, मात्र उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत शिंदेसेनेसोबत तडजोडीचा तोडगा न निघाल्याने अखेर भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार) ने स्वतंत्रपणे युती जाहीर केली.

### राष्ट्रवादीच्या वरिष्ठ स्तरावरून युतीसाठी पुरेपूर प्रयत्न

अजित पवार गटाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे गेल्या दोन दिवसांपासून अकोल्यात डेरेदाखल झाले होते. भाजपासोबत युती व्हावी, यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार त्यांनी युतीसाठी पुरेपूर प्रयत्न केले असून, त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले.

## बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालेदा झिया यांचे निधन

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्या आणि माजी पंतप्रधान बेगम खालेदा झिया यांचे निधन झाले आहे. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. मागील काही वर्षांपासून त्या आजारी असल्याचे सांगितले जाते. बेगम खालेदा झिया यांनी दोनदा बांगलादेशाचे पंतप्रधान म्हणून काम बघितले. पहिल्यांदा १९९१ ते १९९६ आणि त्यानंतर २००१ ते २००६ पर्यंत. त्या बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधानही होत्या. त्यांचे पती झियाउर रहमान हे बांगलादेशचे लष्करी शासक आणि राष्ट्राध्यक्ष होते.

## भांडुप बेस्ट बस अपघातात चौघांचा मृत्यू, १० जखमी

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**मुंबई :** कुर्ला येथे गेल्या वर्षी झालेल्या बेस्ट बस अपघाताची पुनरावृत्ती सोमवारी भांडुप परिसरात घडली. भांडुप स्थानकापासून नरदास नगरकडे जाणाऱ्या बेस्ट बसने १४ जणांना चिरडले. या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून, दहा जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये टाटा रुग्णालयातील परिचारिकेसह तीन महिलांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरदास नगरला जाणारी ६०६ क्रमांकाची वातानुकूलित बस रात्री साडेनऊच्या सुमारास भांडुप स्थानकाच्या पश्चिमेला आली. चालकाने बस मागे घेतली आणि त्यानंतर बस वळवत असताना ब्रेकऐवजी त्याचा पाय एक्सिलेटरवर पडला.

## पुणे महापालिका निवडणुकीत काँग्रेस-ठाकरेसेना युती जाहीर

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**पुणे :** पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानं महाविकास आघाडीत फूट पडली. तर दुसरीकडे काँग्रेस आणि ठाकरेसेनेनं पुण्यात युतीची घोषणा केलीय. एवढंच नव्हे तर काँग्रेस आणि ठाकरेसेनेनं जागा वाटपाचा फॉर्म्युलाही जाहीर केला. खरंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरु असल्यानं ठाकरेसेना आणि काँग्रेसनं आपापसात बोलणी सुरु केली होती. या चर्चेत मनसेही सहभागी झाली होती. मात्र मनसेला अपेक्षित जागा मिळाल्या नसल्यानं मनसेनं काँग्रेस आणि ठाकरेसेनेच्या युतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मात्र कोणत्या पक्षाला किती जागा देण्यात आल्या आहेत.

# अकोला महापालिका निवडणुकीत मोठ्या घडामोडी

◆ प्रतुल हातवळणे, ॲड. गिरीश गोखले यांची घरवापसी

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** आज सकाळी भाजपात घरवापसी झालेले हरिश आलिमचंदानी यांना प्रभाग पंधरा अ मधून तिकिट मिळाले. हरिशभाई यांनी शेकडो समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल केला. अकोला भाजपमध्ये हरिश भाई





यांच्यानंतर पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे निलंबित असलेल्या दोघांना भाजपने पुन्हा पक्षात घेतले. प्रतुल हातवळणे आणि ॲड.गिरिश गोखले यांचे पुन्हा पक्षात स्वागत करण्यात आले. ॲड.गिरिश गोखले यांच्या पत्नी डॉ.स्नेहा गोखले यांची उमेदवारी रद्द झाल्याची माहिती आहे. कॉंग्रेस तर्फे चांदनी रवी शिंदे यांनी यंदा पुन्हा अर्ज दाखल केला आहे. भाजपने मोठा धक्का राजेश मिश्रा यांना दिला आहे. करण साहू यांना राजेश मिश्रा यांच्या विरोधात उमेदवारी दिली आहे. राजेश मिश्रा हे नुकतेच शिंदे सेनेत गेले होते. विधानसभा निवडणुकीत राजेश मिश्रा यांनी भाजप उमेदवाराला धक्का दिल्याने मिश्रा यांना पाडण्याचा चंग भाजपाने आखला आहे.

### भाजपने सुमनताई गावंडे, विजय इंगळे या उमेदवारांचे तिकिट कापले

◆ प्रभाग २० मधून समोर येत आहे.प्रभाग क्रमांक वीस मध्ये सुमनताई गावंडे व विजय इंगळे यांना भाजपने थांबविले आहे. गेल्या निवडणूकीत विजयी झालेले माजी महापौर सुमन गावंडे यांच्यासह विजय इंगळे यांना पक्षाने यंदा उमेदवारी नाकारली आहे. तर प्रभाग वीस मध्ये भाजपने मंगेश झिने, शारदा ढोरे, सोनाली अंधारे आणि विनोद मापारी यांना उमेदवारी दिली आहे.

## हरीश आलिमचंदानी यांनी पुन्हा भाजपात घेतला प्रवेश

प्रतिनिधी ३० डिसेंबर



**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून माजी नगरसेवक हरीश आलीमचंदानी यांनी भारतीय जनता पक्षामध्ये पुन्हा काम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे निलंबन परत घेण्यात आले असून त्यांचे स्वागत खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर यांनी केले. यावेळी जयंत मसने, संतोष शिवरकर, वसंत बाछुका, रंजीत खेडकर, बाळ टाले, रवींद्र भन्साली, गिरीश जोशी, अजय शर्मा, माधव मानकर, डॉ. अमित कावरे, संजय गोटफोडे, नितेश पाली आदी प्रामुख्याने उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळावे, यासाठी एकत्र येऊन काम करू. पक्ष जो आदेश देईल त्या आदेशाचे पालन करेल, अशा शब्दात हरीश आलीमचंदानी यांनी आपल्या भावना व्यक्त करीत घरवापसी केली. तसेच पक्ष नेतृत्व, प्रदेश आणि स्थानिक नेतृत्वाचे आभार व्यक्त मानले. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## काँग्रेस- शिवसेना उबाठा ५० जागांवर लढणार !

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** सध्या महानगरपालिका निवडणुकीचे वातावरण वेगाने बदलत असताना आणि सर्वत्र चर्चा, तडजोडीचे सत्र सुरू आहे. महाविकास आघाडीतही तडजोड सुरू असल्याचे दिसून येत आहे. अकोला महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षांत आघाडी झाल्याचा दावा अकोला पश्चिमचे आमदार साजीद खान पठाण, काँग्रेसचे महानगराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे यांनी रविवारी केला; परंतु कोणत्या पक्षाच्या वाट्याला किती जागा आल्या, हे अद्यापही त्यांनी स्पष्ट केलेले नाही. काँग्रेस आणि उद्धवसेना ५० जागा लढण्यास इच्छुक असल्याचे सांगितले जात आहे. जागा वाटपाबाबत उद्धवसेनेसोबत सोमवारी बैठक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या तीनही पक्षांची आघाडी अधांतरी असल्याचे चित्र आहे. रविवारी सायंकाळी संयुक्त बैठकीत दोन्ही पक्षांचे वरिष्ठ व प्रमुख नेते आमदार साजिद खान पठाण, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. झिशान हुसेन, महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, पक्षाचे समन्वयक प्रकाश तायडे, राष्ट्रवादी (शरद पवार) चे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दिकी, प्रदेश संघटन सचिव जावेद झकरिया, कार्याध्यक्ष सैयद युसूफ अली आणि देवेंद्र ताले उपस्थित होते.

### लवकरच तोडगा निघणार!

काँग्रेस, राष्ट्रवादीत दोन प्रभागांतील जागांवर वाद आहे. त्या प्रभागावर लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा नेत्यांनी व्यक्त केली आहे.

## पातूरला ३२ लाखांचा बनावट दारूचा साठा जप्त

◆ राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई, आरोपी फरार

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**पातूर :** पातूर-वाशिम रोडवरील चिचखेड फाट्याजवळ शिवारात एका शेतातील गोदामात बनावट देशी दारूचा साठा असल्याची गोपनीय माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जिल्हा अधीक्षक सीमा झावरे यांच्या मार्गदर्शनात भरारी पथकाने धाड टाकून सुमारे ३२ लाख रूपयांचा अवैध दारू साठा जप्त केला.

मुझफ्फर खान यांच्या शेतातील एका झोपडीसदृश गोदामात टँगो पंच व रॉकेट ब्रँडची डुप्लिकेट देशी दारू मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आली होती. या कारवाईत अकोला जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक कांबळे, सोनार, भुरळ यांच्यासह भरारी पथक सहभागी होते. धाडीनंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात



दारूचे बॉक्स, बाटल्या व साहित्य आढळून आले. रात्री उशिरापर्यंत साठ्याचे मोजमाप व अंदाजे किंमत काढण्याचे काम सुरू होते. प्राथमिक माहितीनुसार या साठ्याची किंमत ३२ लाख रुपयांपर्यंत असून प्रत्यक्ष मोजमापानंतर नेमकी रक्कम स्पष्ट होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाई दरम्यान घटनास्थळावरून मुख्य आरोपी फरार झाला असून, सदर अवैध साठा नेमका कोणाचा आहे, याचा शोध घेण्याचे काम राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. या प्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. चिचखेड शिवारातील एका शेतातील गोडावूनमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध व डुप्लिकेट देशी दारू साठवण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर आमच्या भरारी पथकाने अकोल्यातील पोलीस निरीक्षक व त्यांच्या टीमसोबत संयुक्त कारवाई केली. ३२ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. मोजमापानंतर अचूक किंमत स्पष्ट होईल. आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे असे अधीक्षक सीमा झावरे यांनी सांगितले.

## बंडखोरीला उधाण ! उमेदवारी नाकारल्याने इच्छुकांची कोंडी !

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अखेरच्या क्षणापर्यंत उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्याचे राजकीय पक्षांनी त्यातही प्रामुख्याने भाजप, शिवसेना, शिवसेना (उबाठा) आणि मनसे यांनी टाळले. मात्र, इच्छुक उमेदवारांना सोमवारी याची कुणकुण लागल्याने दिवसभर राजकीय पक्षांमध्ये नाराजी, बंडखोरी आणि इशारे-प्रतिइशाऱ्यांना उधाण आले होते. काही उमेदवारांनी जाहीर पत्र लिहून नाराजीला वाट करून दिली तर काहींनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला. दरम्यान, मुंबई महापालिकेसाठी भाजप-शिवसेनेचे जागावाटप अंतिम झाले असून भाजप १३७ तर शिवसेना ९० जागांवर लढणार आहे.

तब्बल आठ वर्षांनी होत असलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्षांमध्ये इच्छुकांची संख्या प्रचंड प्रमाणात आहे. त्यामुळे बंडखोरांना थोपविण्यासाठी राजकीय पक्षांनी शेवटच्या क्षणापर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करता मागच्या दाराने उमेदवारांना एबी फॉर्म देण्याची खेळी खेळली आहे. साहजिकच अर्ज दाखल करायचा दिवस उजाडत आला तरी आपल्याला उमेदवारी मिळणार की नाही याचा उमेदवारांना थांगपत्ता नव्हता. मात्र, रविवारी मध्यरात्रीपासून अनेक पक्षांनी उमेदवारांना गुपचूप बोलावून एबी फॉर्मचे वाटप सुरू केल्याने सोमवारी नाराजांनी बंडखोरीचे अस्त्र परजायला सुरुवात केली.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापू लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या उमेदवारांची अधिकृत यादी प्रसिद्ध केली असून, यामध्ये विविध प्रभागांतील एकूण १४ उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे.पक्ष श्रेष्ठींनी अनुभवी कार्यकर्त्यांसह महिलांनाही मोठ्या प्रमाणावर संधी दिल्याचे या यादीवरून दिसून येत आहे. महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या नेतृत्वात ही निवडणूक होत आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात काल युती झाली त्यानुसार आज चौदा जागांवर उमेदवारी जाहिर करण्यात आली.

| उमेदवाराचे | प्रभाग | गट |
|---|---|---|
| अ. रहीम अ कादर पेंटर | ०१ | अ |
| शाजिया रिजवान अजीज अलिशाह | ०१ | क |
| शेख नाजीम शेख रमजान | ०१ | ड |
| मानवतकर वैशाली किशोर | ०२ | अ |
| अजय रामदास रामटेके | ०९ | अ |
| सौ. गायकवाड शितल मनोज | ०९ | ब |
| नकीर खान अहमद खान | ११ | अ |
| मोरवाले बनोबी शेख कासम | ११ | ब |
| समिना परविन नकीर खान | ११ | क |
| सौ. संगिता मदन भारगड | १२ | क |
| नर्गिस परविन फैय्याज खान | १६ | क |
| शितल संतोष डाबेराव | १७ | अ |
| वैशाली सुधिर कहाकर | १७ | क |
| कविता दीलीप देशमुख | १८ | क |

## नागपुरात महायुतीचं ठरलं, दोन जागांसाठी अडलं !

भाजपच्या वाट्याला १४३, तर शिवसेनेला ८ जागा
अजितदादांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**नागपूर :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्यानिवडणुकांमधील दणदणीत विजयानंतर भाजप आणि महायुतीचा विश्वास दुणावला आहे. अशातच आता हीच विजयी घोडदौड महापालिका निवडणुकांमध्ये कायम ठेवण्यासाठी नागपुरात भाजप जोरदार मोर्चेबांधणी करत आहे. तर दुसरीकडे काँग्रेस आणि महाविकास आघाडी देखील हे आव्हान रोखून धरत कधीकाळी काँग्रेसचा गड समजल्या जाणाऱ्यानागपुरात राजकीय समीकरण आखताना दिसत आहे. एकंदरीत या सर्व घडामोडींकडे बघता पक्षश्रेष्ठींनाजागावाटप करताना मोठी सावधगिरी बाळगावी लागत असल्याचे चित्र आहे.

नागपुरातमहायुतीतभाजपआणि ाशिवसेनाएकत्रलढणर यावर शिक्कामोर्तब झाले असतानाअद्याप मात्र भाजप आणि शिवसेना युतीचा गुंता पूर्णपणे सुटलेला नाही. भाजपने शिवसेनेला ८ जागा देऊ केल्या आहेत.

मात्र शिवसेना प्रभाग २१ आणि २४ मधील प्रत्येकी एक अशा आणखी २ जागांसाठी आग्रही आहे. परिणामी, सोमवारी रात्री भाजप आणि शिवसेना नेत्यांच्या बैठकीत आठ जागांवर सहमती झाली. मात्र शिवसेनेला अतिरिक्त दोन जागा हव्या असल्याने आज सकाळी पुन्हा एकदा चर्चा होण्याची शक्यता आहे. सध्या भाजप तब्बल १४३ जागांवर तर शिवसेना ८ जागांवर लढणारअसल्याचे निश्चित झालं आहे. तर नागपूरमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी स्वबळावर लढत आहे.

### काँग्रेसच्या उमेदवारांकडे एबीफार्मचा पत्ता नसल्याचेचित्र

◆ दुसरीकडे, उमेदवारी अर्ज भरायचा आजचा शेवटचा दिवस आहे. मात्र काँग्रेसच्या उमेदवारांकडे एबीफार्मचा पत्ता नसल्याचे चित्रआहे. सकाळी १० वाजतापर्यंत एबी फार्म दिले जाईल, असा इच्छुकांना पक्ष नेतृत्वाकडून संदेश देण्यात आला आहे. त्यामुळे आता नेमका कधी आणि कोणालाही उमेदवारी जाहीर होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### वरिष्ठ नगरसेवकांऐवजी तरुण उमेदवारांना संधी

◆ भाजपनं नागपुरातील बहुतांशी प्रभागांसाठी नाव निश्चित करत उमेदवारांना एबी फॉर्म दिले. अनेक ठिकाणी भाजपने यंदा भाजपने अनेक वर्ष निवडून आलेल्या वरिष्ठ नगरसेवकांऐवजी तुलनेने तरुण उमेदवारांना संधी दिलीय. प्रभाग २४मध्ये भाजपने अवघ्या २४ वर्षाच्या दुर्गेश्वरी कोसेकर या सिव्हिल इंजिनियरला उमेदवारी देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.

CMYK

# नायलॉन मांजा वापरल्यास पालकांना ५० हजार तर, विक्रेत्यांना अडीच लाखांचा दंड

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अमरावती:** मकर संक्रांतीच्या निमित्ताने पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर आणि विक्री केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणावर पशु-पक्षी आणि नागरिकांना इजा पोहोचते. नायलॉन मांजाबाबत कडक भूमिका घेत, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचा वापर करणाऱ्यांवर आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार, मांजा वापरणाऱ्या मुलांच्या पालकांना ५० हजार रुपये आणि विक्रेत्यांना २.५० लाख रुपयांचा दंड ठोठावण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. न्यायालयाच्या निर्देशानुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळला, तर त्याच्या पालकांना ५० हजार रुपयांचा दंड का आकारला जाऊ नये? असा प्रश्न उपस्थित करत ही कारवाई केली जाईल.

# महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान!

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**दर्यापूर:** आयएसओ नामांकन व निती आयोग नोंदणीकृत एनजीओ महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापूरच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव व सत्कार समारंभ नुकताच राधिका सेलिब्रेशन हॉलमध्ये ट्रस्टचे ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णासाहेब अढाऊकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी रचनात्मक व विधायक कामातील भरीव कामगिरीच्या गौरवार्थ शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य व डॉ.वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानचे सचिव हेमंत काळमेघ यांना शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती कार्य गौरव पुरस्काराने तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलढाणा येथे कार्यरत विभागीय लेखापाल उमाकांत चिंचोळकर यांना फुले -शाहू -आंबेडकर स्मृती कार्य गौरव पुरस्काराने सपत्नीक तर श्री. क्षेत्र अडुळा बाजार येथील स्व. शारदा बाळकृष्ण नवले स्मृती उद्योग रत्न पुरस्काराने प्रियदर्शनी महिला बचत गटाच्या अध्यक्ष श्री गृह उद्योग अंजनगाव सुर्जीच्या संचालिका



सौ.हर्षवती सुरज पवार यांना शाल ठमी सावित्री- माझी कर्मकहानी ठ हे विचार पुष्प, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन आ. गजानन लवटे यांच्या हस्ते मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी एसएससी व एच एस सी परीक्षेत तालुक्यातून गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे सुद्धा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व विचार पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.गणेश खारकर, महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष दिलीप लोखंडे, थोर विचारवंत व ऋणानुबंध टीमचे संयोजक समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड, माळी महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रा. नानासाहेब कांडलकर, भाजपाचे जिल्हा महामंत्री युवा नेते सुधीर रसे, राज्य कोषाध्यक्ष तथा गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण गोरडे, विभागीय अध्यक्ष राजेश जावरकर, संचालक प्रा. हेमंत बेलोकार, खरेदी विक्रीचे सभापती काँग्रेस नेते गजानन जाधव, जि. प. माजी सदस्या सौ.वंदना करूले, संचालिका सौ. निलिमा अडोकार, क्राफ्ट सिटी ॲग्रो प्रोडूसर कंपनीच्या अध्यक्ष सौ. वंदना ढोकणे उपस्थित होते. याप्रसंगी नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. मंदाकिनी भारसाकळे, अंजनगाव सुर्जीचे नवनिर्वाचित नगरसेवक श्रीकांत जुनगरे यांचा आ. गजानन लवटे यांच्या हस्ते शाल व विचार पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ नेते सुधाकर भारसाकळे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे, युवा नेते अंकुश कावडकर, राजीव बुंदिले, प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक, सामाजिक, सहकार व विविध क्षेत्रातील मान्यवरांचे स्व. मोरेश्वर बळीराम रेवस्कर (माजी प्राचार्य) स्मृती पारितोषिक देऊन संशोधन क्षेत्रातील भरीव कामगिरीच्या गौरवार्थ प्रा. गजानन भारसाकळे, राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक पंकज वऱ्हेकर, जिल्हा आदर्श शिक्षिका सौ. सुचिता पवार, आयडॉल टीचर ने सन्मानित अमोल वऱ्हेकर, डॉ. संगीता बेलोकार, डॉ. ज्योत्स्ना होले, अंकुश चांदुरकर, पुष्कल मेहरे, अमन पोटदुखे, कार्तिक इंगळे, आदित्य हाडोळे, मयुरी काळे, प्रणय बोबडे दिव्यांनी दिघडे, मोनिका जुनगरे वृषभ कोळमकर, ऋतुजा जुनघरे, डॉ.श्रद्धा चिंचोळकर आदींचा मान्यवरांच्या हस्ते शाल व विचार पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच क्रांतीसुर्य महात्मा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती समारोहाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या खुल्या निबंध स्पर्धेच्या यशस्वी स्पर्धकांना सुद्धा मान्यवरांच्या हस्ते गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन पथ्रोट सौजन्याने स्मृतिचिन्ह व विचार पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

# मासिक सभा न घेता परस्पर निविदा प्रक्रिया केल्याचा आरोप

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**धारणी :** धारणी तालुक्यातील दादरा ग्रामपंचायतीत सरपंच व सचिवांनी नियम डावलून कारभार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात संबंधित ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांनी ५ डिसेंबर रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती धरणी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीची मासिक सभा नियमितपणे घेण्यात आलेली नाही. तसेच उपसरपंच व सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर ठराव करून निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर कामासाठी कोणतीही चर्चा न करता थेट स्वतःच्या ओळखीच्या कंत्राटदाराला काम देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामपंचायतीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नियमांचे



उल्लंघन झाल्याचा आरोप उपसरपंचांनी केला आहे. सदर ठराव व निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून ती रद्द करण्यात यावी, तसेच नव्याने सर्व ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात घेऊन नियमाप्रमाणे प्रक्रिया राबवावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीची दखल घेऊन संबंधित प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधूनही होत आहे. सदर प्रकरण इतर ही ग्रामपंचायत मध्ये होऊ शकते असे म्हटले जात आहे.प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधिनियम कलम 36 अन्वये आदेश जारी

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अमरावती:** जिल्ह्यात ३० डिसेंबर रोजी महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने तसेच नामांकन पत्र दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्यादिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवार नामांकन पत्र दाखल करण्याची शक्यता आहे. अशावेळी सभांचे आयोजन व मिरवणूक काढण्यात येतात. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आली आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. १० जानेवारी २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये आदेश जारी करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करण्याचेआदेश पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी निर्गमित केला आहे.

रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, सर्व धाब्यावर आणि सार्वजनिक ठिकाणच्या कपडे धुण्याचा व उतरविण्याचा जागेच्या ठिकाणी व इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-यांनी या अधिनियमाच्या कलम ३३, ३५, ३७ ते ४०, ४४ व ४५ अन्वये कार्यवाही करावी, असे पोलीस आयुक्त यांच्या आदेशात नमूद केले आहे.

# नववर्षानिमित्त चिखलदरा येथील वनवे वाहतूक व्यवस्था दोन दिवस राहणार

प्रतिनिधी ३० डिसेंबर

♦ पर्यटकांच्या सुविधेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**अमरावती :** सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा येथे पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. ही गर्दी आणि घाट रस्त्यावरील संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने वाहतूक नियमात अंशत: बदल केले आहेत. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिलेल्या आदेशानुसार, बुधवार (३१ डिसेंबर २०२५) ते गुरुवार (१ जानेवारी २०२६) या कालावधीत चिखलदरा मार्गावर 'वन-वे' (एकमार्गी) वाहतूक लागू करण्यात आली आहे.चिखलदऱ्याकडे येणारा परतवाडा ते चिखलदरा हा रस्ता अरुंद आणि तीव्र घाटाचा असल्याने अपघाताची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने चिखलदऱ्याला जाण्यासाठी आणि परतण्यासाठी वेगवेगळे मार्ग निश्चित केले आहेत. नवीन नियमानुसार, पर्यटकांना चिखलदऱ्याला जाताना परतवाडा-धामणगाव गढी-चिखलदरा या मार्गाचा वापर करावा लागेल. तर पर्यटनानंतर परत येताना चिखलदरा-घटांग-परतवाडा या एकमार्गी रस्त्यानेच खाली उतरावे लागणार आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, या मार्गावरील गावांमध्ये राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना या नियमातून सवलत देण्यात आली आहे. मात्र, इतर पर्यटकांनी या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ नुसार कारवाई करण्यात येईल. चिखलदऱ्यातील कडाक्याची थंडी आणि पर्यटकांचा ओघ पाहता जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्थानिक प्रशासन पूर्णपणे सज्ज असून पर्यटकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

# शिंदे शिवसेनेचे जगदीश गुप्ता यांचा राजीनामा

♦ महायुतीच्या जागा वाटपावरून होती नाराजी, उपमुख्यमित्राकडे राजीनामा सुपूर्द

प्रतिनिधी ३० डिसेंबर



**अमरावती :** शिंदे शिवसेना गटाचे नेते माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी शिंदे शिवसेना मधून राजीनामा दिला आहे. भाजपा, शिंदे शिवसेना व युवा स्वाभिमानी पक्षाच्या महायुती संदर्भात जागा वाटपावरून त्यांची नाराजी होती. ग्रँड मैफिल येथे पार पडलेल्या शिंदे शिवसेना गटाच्या महत्त्वपूर्ण बैठकीतून सोमवारी ते अचानक बाहेर पडले होते. त्यानंतर त्यांचे संबंध ताणल्या गेले होते. मात्र अचानक त्यांनी राजीनामा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केल्यामुळे अमरावती पुन्हा राजकीय भूकंप झाला आहे. त्यामुळे माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता काय भूमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीने अजित पवार गटाच्या सुलभा खोडके यांना उमेदवारी दिल्यामुळे हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन जगदीश गुप्ता यांनी विधानसभेची निवडणूक लढवून सन्मान जनक मते घेतले होते. त्यामुळे सुलभा खोडके यांचा शेवटच्या टप्प्यात निसटता विजय झाला होता. त्यामुळे राजकीय दृष्ट्या जगदीश गुप्ता यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. त्यांनी भाजपला रामराम करून बंडखोरी करून अपक्ष निवडणूक लढवली होती. निवडणुकीनंतर त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. मात्र आता शिंदे गटातूनही ते बाहेर पडल्याने अमरावतीत महायुती सुद्धा शिवसेना शिंदे गट स्वबळावर निवडणूक लढवत असल्याची चर्चा आहे. काल रात्रीपर्यंत भाजपाने शिवसेना शिंदे गटाला १६ जागा सोडल्या होत्या. मात्र आणखीन त्यांना जागा ओढून पाहिजे होत्या. त्यामुळे महायुतीच्या महानाट्यनंतर भाजपा शिवसेनेची युती तुटली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे सुद्धा स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे अमरावती महानगरपालिकेची निवडणुकीची चुरशीची व प्रतिष्ठेची ठरणार आहे.

# दर्यापुरात टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांचे आयोजन

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**दर्यापूर :** दर्यापूर क्रिकेट क्लब तर्फे स्व. बंटीभाऊ सूर्यवंशी यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन म्हणून भव्य 'खुले टेनिस बॉल क्रिकेट' सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या सामन्यांचे उद्घाटन मंगळवारी विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. स्थानिक बस स्थानक जवळील कन्या शाळा मैदान इथे सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. सामन्याचे प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये नगरसेवक तथा शिवनेरी वाडा हॉटेल चे संचालक रामेश्वर चव्हाण यांच्यातर्फे दिल्या जाणार असून द्वितीय पारितोषिक २५,००१ व सन्मानचिन्ह भवानी वीट सप्लायर्स . मुन्नाभाऊ बैताळे (नगरसेवक, नगरपरिषद दर्यापूर) यांच्या हस्ते तर तृतीय पारितोषिक १५,००१ व सन्मानचिन्ह श्रीराम ॲग्रो सर्व्हिसेस यांच्यातर्फे दिले जाणार आहे. त्यानंतर बेस्ट बॅट्समन, बेस्ट बॉलर ५००१, बेस्ट फिल्डर मॅन ऑफ द मॅच ५००१ तर विशेष पारितोषी ५००१ बेस्ट कीपर ५००१ बेस्ट कॅच ५००१, ऑल राऊंडर ५००१ दिले जाणार आहे. या सामन्यांचे आमचे आधारस्तंभ :- प्रमोद टेवरे, मिलिंदभाऊ शहा, जयेश जोशी, अनिल भारसाकळे, डॉ. रविंद्र साबळे, रुपेश मलिये, कुंदनभाऊ गहरवाल, शैलेंद्र चौधरी, संदीप अरबट, पंकज काळे, पंकज पतिंगे, नितीन चव्हाण, विजयभाऊ वाघमारे, विशाल देशमुख, प्रदीप दोनोहे, अमित सोळंके, नितीनभाऊ पीडीआर, मेहेरदीम तराळे, स्वप्निल विल्हेकर, मंगेशभाऊ फुकट, चंदूभाऊ खंडारे, प्रफुल्ल बोरखडे, मो. अझीम, इद्रिस इकबाल, इरफान पाणिवाले, विजयभाऊ पाचडे, प्रशांत कोलटक्के, संदीपभाऊ, अलीम भाई, वैभव वानखडे राहणार असून पंच कमिटी :- दीपकभाऊ तायडे, अनुराग सूर्यवंशी, नयन मानकर, सागर बुन्हाडे, तनय गावडे, वैभव अंभोरे, वैभव बुरघाटे, प्रफुल्ल ठाकूर, गौरव पाथरे, सुबोध वैराळे, निखिल पतिंगे, गौरव ठाकूर, संकेत शेवणे, प्रेम देशमुख विशाल राठोड, गौरव गोमाशे, ओम चौव्हाण, सौरभ तळोकार, अखिलेश अघडते, जावेद शहा, अ. मजीद, सै. फारूक, रहान भाई (टाकळी), नसिम वेग, शहबाज शहा, गोविंद माहुरे, नकुल खारोडे, आहेत ङ नाव नोंदणी करिता संपर्क अनुराग सूर्यवंशी- ७३८७८५८४०० सागर बुन्हाडे - ७२१९६६०२१४ नयन मानकर ७३८७२८९१५८ तनय गावंडे ९०७५५५७५७३ गौरव पाथरे ७०२८४२२०५५ वैभव अंभारे ८१८००३८५४९ राहणार आहे.

# अमरावती शहर गुन्हे शाखेकडून मंदिर चोरी करणाऱ्या रेकॉर्ड वरील गुन्हेगार ताब्यात

२ गुन्हे उघडकिस

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अमरावती :** .पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती शहरातील घरफोडी व मंदीर चोरी चे गुन्हे उघडकिस आणने बाबत आदेशित केल्या वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षीक, संदीप चव्हाण, यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा अमरावती शहर येथील पोउपनि सागर हटवार व पथक ज्यांच्या सहाय्याने गुन्हे शाखा अमरावती शहर पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी खालील प्रमाणे कार्यवाही केली. दिनांक २९/१२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथील अप.क. ३५१/२०२५ कलम ३०५ (अ), ३३१ (१) भा.न्या.सं. प्रमाणे दाखल गुन्हयाचा समांतरतपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाख अमरावती ग्रामिण कडुन खात्री लायक माहीती मिळाली की, सदर गन्हयातील आरोपी हा याच प्रकारचे



गुन्हे करण्याच्या उद्देशाने गांधी चौक परीसरात फिरत आहे अशा स्थानिक गुन्हे शाखे मार्फत प्रापत माहीती वरून गोपाल मोहन युवनाते वय ४२ वर्ष रा. पांढरघाटी ता. वरूड जि. अमरावती यास गांधी चौक परीसरामधुन ताब्यात घेतले त्याला बारकाईने विचारपूस केली असता त्याने अमरावती शहरामधील पोलीस स्टेशन खोलापुरी गेट व बडनेरा हद्दीत त्याच्या साथीदार नामे रामचंद्र युवनाते सह मंदीर चोरी केल्याची कबुली दिली. त्याचा साथीदार याचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही वरून सदर आरोपी यास ताब्यात घेण्यात आले. गोपाल मोहन युवनाते वय ४२ वर्ष रा. पांढरघाटी ता. वरूड जि.अमरावती असून फरार आरोपीचे मध्ये रामचंद्र युवनाते रा.पांढरघाटी ता. वरूड जि. अमरावती आहे.पो.स्टे. खोलापुरी गेट ३५१/२०२५ कलम ३०५ (अ), ३३१ (१) भा.न्या.सं. पो.स्टे. बडनेरा ६७९/२०२५ कलम ३०५ (अ) भा.न्या.सं. आहे. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त . गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा रमेश धुमाळ, . शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखील गेडाम, संदीप चव्हाण यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने अनाथांना ब्लँकेट वाटप

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**खामगाव :** स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली २५ वर्षा पासून मंडळाच्या माध्यमातून विविध धार्मिक व अनेक सामाजिक उपक्रम राबवत आहेत. ज्या लोकांच्या डोक्यावर छत नाही अंगावर पुरेसे कपडे नाही खायला दोन वेळचे अन्न नाही अशा समाजातील उपेक्षिता प्रती आपले पण काही देने लागते हा उद्देश समोर ठेवून सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे गरीबांना नेहमी मदत करणारे मुन्ना शर्मा यांनी सन २००० मध्ये ह. भ. प.गोपाल महाराज रेवस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली भजनी मंडळाची स्थापना केली भजनाच्या माध्यमातून व आपल्या सर्वांच्या सहकार्याने आज पर्यंत मंडळाच्या माध्यमातून निस्वार्थ अखंडपणे अनेक उपक्रम सुरू आहेत शहरात गेल्या काही दिवसापासून वाढती थंडी पासून



नागरिक त्रस्त झाले आहेत अश्या जीव घेण्या थंडीत खामगाव शहरात अनेक निराधार व्यक्ती उघड्यावर जगण्यास मजबुर आहेत दिवस कसाबसा काढणाऱ्या या निराधारांसाठी थंडीची रात्र काढणे अत्यंत कठीण झाले आहे नियतीने उघड्यावर आणलेल्या अंध. अपंग. आणि वृध्द निराधारांना रेल्वे स्टेशन. बस स्थानक. तसेच मंदिराचा आधार घ्यावा लागत आहे माणुसकी गोठल्या सारख्या समाजात आज ही काही ठिकाणी वृध्द आई वडिलांना घराबाहेर काढले जाते तसेच काम करण्यास असमर्थ असलेल्या अंध. अपंग व्यक्तींना ही वाऱ्यावर सोडले जाते कुटुंबाकडून झिडकारलेल्या अशा निराधारांना उघड्यावर भीक मागून जीवन जगावे लागते खामगाव शहरात व परीसरात अनेक निराधारांचे वास्तव्य असुन ते थंडी. ऊन. पावसात कसाबसा जीवन संघर्ष करीत असल्याचे चित्र दिसुन येत आहे नियतीने असे जीवन त्यांच्या वाट्याला आले असून नरकयातना सहन करत ते दिवस काढत आहे २८ डिसेंबर रविवार रोजी रात्री शहरातील रेल्वे स्टेशन. बस स्थानक. शनिमंदिर. संकटमोचन हनुमान मंदिर सामान्य रूग्णालय व परीसरातील लोकांना तेथे जावुन ब्लँकेट वाटप करण्यात आले.

# बसस्थानक परिसरातून गांजासह युवक ताब्यात, मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**खामगाव :** शहरातील बसस्थानक परिसरात २९ डिसेंबर रोजी अमली पदार्थ विक्री विरोधात पोलिसांनी केलेल्या कारवाईत १९ वर्षीय युवका कडून गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी खामगाव बसस्थानकासमोर आरोपीची झाडाझडती घेतली. झडती दरम्यान आरोपीच्या ताब्यातून १६८ ग्रॅम गांजा, रोख रक्कम, तसेच ५,००० रुपये किमतीचा मोबाइल, असा एकूण १०,२७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस निरीक्षक रामकृष्ण नारायण पवार (५३) यांच्या फिर्यादीवरून चेतन राजेश चुनेकर (१९, रा. रेखा प्लॉट, सतीफैल, खामगाव) याच्याविरुद्ध एनडीपीएस अक्ट कलम ८ (क), २० (ब)(ii)(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विकास पाटील करीत आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत शिराळा येथे ग्राम स्वच्छता

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**खामगाव :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत खामगाव तालुक्यातील ग्राम शिराळा येथे रविवार दिनांक २८डिसेंबर ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे. ही चळवळ लोक चळवळ व्हावी. यासाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी. शिवशंकर भारसाकळे, खामगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी



चंदनसिंह राजपूत, अतिरिक्त गटविकास अधिकारी शेख साहेब इत्यादी अधिकारी वर्गासह ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर , बचत गटाच्या महिला सदस्य, यांच्यासह शासनामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध स्तरावरील कर्मचाऱ्यांनी सदर ग्रामस्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये गावातील रस्ते, नाल्या, गटारे, साफ करण्यात आले. त्यासोबतच ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करण्यात आला. पाण्याचा निचरा व्हावा यासाठी लोकांना सूचना देण्यात आल्या. प्लास्टिकचा वापर टाळण्याची सुद्धा आवाहन केल्या गेले. गाव प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्व गावाने कटिबद्ध असल्याचे सांगितले.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५

http://epaper.citynewssuperfast.com

# क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या अमरावती विभागातील मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळेमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच क्रीडा नैपुण्य विकसित होण्यासाठी विभागांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अमरावती विभागातील ५ जिल्ह्यातील मुला-मुलींची शासकीय निवसी शाळांचे विभागीय स्तरावरील स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. ३० डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने स्पर्धेमध्ये अंदाजे ८०० ते ८५० विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित राहणार आहे.

## विभागातील निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे अकोल्यात स्नेहसंमेलन

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला:** सामाजिक न्याय विभागातर्फे शासकीय निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे विभागीय स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी अकोला येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे. अमरावती विभागातून पाचही जिल्ह्यातून सुमारे ८५० विद्यार्थी त्यात सहभागी होतील. समाजकल्याण विभागाच्या नियंत्रणातील पाचही जिल्ह्यांतील शासकीय निवासी शाळा सहभागी होणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच क्रीडा स्पर्धांमध्ये सांघिक व वैयक्तिक मैदानी खेळांचा समावेश राहील. त्याबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे.

# मतदार जनजागृती अंतर्गत मनपा शालेय विद्यार्थ्यांची रंगभरण व रांगोळी स्पर्धा

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने अकोला महानगरपालिकेच्या मनपा मराठी मुलांची शाळा क्र.१९ व हिंदी शाळा क्र. ८ व उर्दू मुलांची शाळा क्र. ११ च्या विद्यार्थ्यांची रंगभरण आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीपर विविध आकर्षक चित्र काढली असून ज्यामध्ये वोट का दान - लोकतंत्र की पहचान, फिशपॉट सारखे मर्यादित राहू नका – बाहेर पडा मतदान करा, मतदान करा - लोकशाही बळकट करा, आई बाबाना करा घाई – जा लवकर म्हणा – या बोटाला लावून शाई, मतदान केंद्र, चला आजी, आई पटापट लोकशाही करू बळकट, आदी जनजागृतीपर विद्यार्थ्यांव्दारे या मतदान जनजागृतीपर विविध प्रकारच्या चित्रांमध्ये रंगभरण स्पर्धाच्या माध्यमातून फलके तयार करण्यात आले तसेच रांगोळ्या काढण्यात आली. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, व्दितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कारपर कलर बॉक्स, कलर स्केचपेन सेट आणि पेन बक्षीस स्वरूपात देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी पालक वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

यावेळी शाळेचे मुख्याद्यापक मनोज बोचरे, अशोक बुलबुले, सुवर्णा शिरसाट, आशा गावंडे, भारती परसल्लू, मिनाक्षी भुरे, कमल वानखडे, अफसर खान, सारिका तिवारी आदी शिक्षक शिक्षिकांची उपस्थिती होती.

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा शतकोत्सव साजरा

प्रतिनिधी ३० डिसेंबर

◆ जुन्या शहरात पक्ष कार्यालयात कार्यक्रम




**अकोला:** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या १०० व्या वर्धापन दिना निमित्त जुन्या शहरातील भाई मधुकर उतखडे भवन गीताई सभागृह येथे कार्यक्रम झाला. पक्षाचे ज्येष्ठ नेते रमेश गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १०० वा. वर्धापन दिन चिरायू होवो, जगातील शेतकरी, मजूर एक व्हावे असे नारे लावण्यात आले. नंतर कामगार नेते रमेश गायकवाड व नयन गायकवाड यांनी, १०० वर्षाचा इतिहास हा संघर्ष, त्याग आणि बलिदानाचा असल्याचे प्रतिपादन केले. ब्रिटिश साम्राज्यवाद, पोर्तुगाल, डच विरोधात कम्युनिस्ट पक्षाने देशभर प्रखर लढा दिला. स्वातंत्र्यलढ्यात गोवा हैदराबाद मुक्ती लढ्यात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी तुरुंगवास, हालअपेष्टा आणि अमानुष यातना सहन केल्या. त्यांच्या संघर्षामुळेच देशात स्वातंत्र्य, कामगार कायदे परत अस्तित्वात आले, धर्मनिरपेक्षतेची मूल्ये रुजली आहे. पक्ष कार्यालय ते महावीर किराणा जवळच्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमे पर्यंत रॅली काढून शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. सुनीता जगताप, एस. एन. सोनोने, ज्योती ताथोड, मायावती बोरकर, अनिता अंभोरे, पुनम खोब्रागडे, सुवर्णा चवरे, पौर्णिमा पाटील, ज्योती गायकवाड, सुमित्रा वानखडे, सुवर्णाताई गवई, विद्याधर ढोरे, अजय ठाकरे, सुहास अग्निहोत्री, रितू घ्यारे आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना; केवायसीसाठी अखेरचे २ दिवस

**अकोला:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि केवायसीच्या आधार प्रमाणीकरण करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत असून, ती तत्काळ पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचे ई केवायसी करून पती अथवा वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोटीतांनी घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा. न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी. अंगणवाडी नसल्यास बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अर्जासह कागदपत्रे देऊन शिफारस घ्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात रोजगार निर्मितीबाबत ना. निलय नाईक यांना निवेदन


प्रतिनिधी ३० डिसेंबर



**अकोला:** जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे हजारो तरुण बेरोजगारीच्या समस्येला सामोरे जात आहेत. यासाठी शासन स्तरावर काही तातडीचे निर्णय व योजना राबविल्यास जिल्ह्यातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, या संदर्भात ना. निलय नाईक यांना गौरव चव्हाण यांनी निवेदन दिले.

अकोला जिल्ह्यात रोजगार वाढीसाठी नवीन औद्योगिक क्षेत्र मंजूर करावे, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक प्लॉट उपलब्ध करावेत, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रांची संख्या वाढवावी, तरुणांना मोफत कौशल्य प्रशिक्षण, रोजगार-उन्मुख कोर्सेस सुरू करावे, शिवरोजगार व स्वयंरोजगार योजनांची अंमलबजावणी सुलभ करावी, बँक कर्ज, सबसिडी व योजना लाभ सहज उपलब्ध करून द्यावेत, जिल्ह्यात आयटी, सेवा उद्योग, फूड प्रोसेसिंग, वस्त्रउद्योग इत्यादी उद्योगांसाठी विशेष क्लस्टर स्थापन करावे. ज्यामुळे स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होईल. पुणे, मुंबईवर अवलंबून राहावे लागणार नाही असे गौरव चव्हाण यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला :** नियोजन भवन येथे राष्ट्रीय ग्राहक दिन आज साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा मीना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

डिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार मार्गदर्शन व जनजागृती यावेळी करण्यात आली. जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास जिल्हा पुरवठा कार्यालय अकोला व तहसील अकोला येथील अधिकारी, कर्मचारी व मोठ्या प्रमाणावर ग्राहक उपस्थित होते. संजय पाठक, कैलास बगडे यांनी ग्राहकांच्या हक्काबाबत ग्राहकांना मार्गदर्शन केले. जिल्हा ग्राहक मंच अकोलाचे अध्यक्ष श्री. कुलकर्णी यांनी यावेळी डिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी कलापथकाचा तसेच पथनाटय यांच्याद्वारे प्रबोधनत्मक कार्यक्रमही झाला. कार्यक्रमस्थळी बीएसएनएल, महावितरण, आयओएसएल, बीपीसीएलजी एचपीसीएल,, गॅस कंपनी, वैधमापन विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, अन्न व औषध प्रशासन अकोला, शासकीय महाविदयालय तसेच जिल्हा आरोग्य विभागाचे मुख्य समन्वयक अकोला यांनी आवश्यक साहित्य, फोटो इत्यादीची प्रदर्शनी लावून राष्ट्रीय ग्राहक दिनाचे महत्व ग्राहकांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना उस्केल यांनी केले तर प्रस्ताविक जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार यांनी केले. आभार रसिका वाकोडे यांनी मानले.

# रब्बी पिकांसाठी धरणातील पाणी नदी पात्रात सोडण्यासाठी ठिय्या आंदोलन

◆ पातूर तालुक्यातील सावरगाव येथील शेतकरी बसले आंदोलनाला



प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोला:** या रब्बी हंगामासाठी धरणातील पाणी नदी पात्रात सोडावे या मागणीसाठी पातूर तालुक्यातील शेतकरी सतत मागणी करीत आहेत. या बाबत त्यांनी निवेदन देऊन मागणी पूर्ण झाली नाही. त्यामुळे संतप्त शेतकरी सोमवारी सायंकाळी उशीरा पर्यंत शेतकरी ठिय्या दिला. प्रशासनाने मागण्या मान्य केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

या वर्षातील रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना पाणी हवे आहे. या साठी सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली सावरगाव आणि परिसरातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले. नदी पात्रात पाणी सोडण्यात यावे. तसेच पाण्याचा जो कर आकरण्यात येईल तो आम्हाला मंजूर आहे. कॅनाल नादुरुस्त असल्यामुळे पाणी लवकरात लवकर नदी पात्रात सोडण्यात यावे अशी मागणी ज्ञानेश्वर डवंगे, महादेव सोळंके, राहुल पायधन, दत्तात्रय पाचधन, महोदव शिंदे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

## निधन वार्ता

### आदित्य बावनकार



**हिवरखेड:** येथील चंडिका चौकातील रहिवासी आदित्य संजय बावनकार या १७ वर्षीय युवकाचे २७ डिसेंबर रोजी निधन झाले. आदित्यच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अत्याचार प्रकरणी आरोपीला १ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**अकोट:** अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी येथील प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश पहाडे यांनी दहिहांडा पोलिस स्टेशन मध्ये दाखल पोक्सो अधिनियम मधील आरोपी योगेश अभिमन्यू वाघमारे राहणार हिवरा आश्रम याला १ जानेवारी पर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

एका अल्पवयीन मुलीस तिच्या पालकांच्या रखवालीतून पळवून नेवून संभाजीनगर येथे जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याच्या प्रकरणाचा तपास करण्याकरिता आरोपीची १ जानेवारी पर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

या प्रकरणात दहिहांडा पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक सोपान डाबेराव यांनी पोलिस कस्टडी अर्ज न्यायालयात दाखल केल्यावर सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, या प्रकरणात अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दहिहांडा पो.स्टे.ला या आरोपी विरूद्ध फिर्याद दिली की, त्यांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी १० व्या वर्गात शिक्षण घेत आहे. परंतु सायंकाळी ७ वाजता कामावरून घरी परत आल्यावर अल्पवयीन मुलगी न दिसल्याने तिचा शोध घेण्यात आला पण ती कुठेही दिसून आली नाही. त्यामुळे आरोपी विरूद्ध फिर्याद नोंदविण्यात आली. कारण आरोपीवर फिर्यादीचा संशय होता. या प्रकरणात सायबर सेल अकोला यांना आरोपीचे मोबाईल लोकेशन मिळाल्याने आरोपीला व पीडित मुलीला पोलिसांनी संभाजीनगर येथून ताब्यात घेतले व दहिहांडा पोलिस स्टेशनला हजर केले. त्या मुलीने बयानात सांगितले की, आरोपीने तिच्या इच्छेविरूद्ध संबंध स्थापन केले. त्यामुळे या प्रकरणात संभाजीनगर येथे जावून घटनास्थळ पंचनामा करणे बाकी आहे, आरोपीची वैद्यकीय चाचणी व आरोपीचे कपडे जप्त करणे बाकी आहे. तसेच या प्रकरणात आरोपी सहकार्य करीत नसून उडवा उडवीची उत्तरे देत आहे. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून गुन्ह्यात तपास करणे जरूरी असल्याने आरोपीची १ जानेवारी २०२६ पर्यंत पोलिस कोठडी देण्यात यावी असा युक्तिवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात केला. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपीची वरील प्रमाणे कोठडीत रवानगी केली

# किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांनी साकारला इको फ्रेंडली फ्रिज




प्रतिनिधी ३० डिसेंबर

**पातूर :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग व विज्ञान मंडळाच्या वतीने दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन नुकतेच पार पडले. यामध्ये पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी साकारलेली इको फ्रेंडली फ्रिज ची प्रतिकृती तालुक्यातून प्रथम आली आहे. प्रतिकृती सकरणारे शाफे खान शोएब खान आणि ओम जाधव हे विद्यार्थी तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. तालुक्यातील चोंढी येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय येथे ही विज्ञान प्रदर्शनी पार पडली. या दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक गटातील ३३ तर माध्यमिक गटातील ३० अशा एकूण ६३ प्रतिकृतींनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर आधारित विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स व उपयुक्त संकल्पना प्रभावीपणे सादर केल्या. यामध्ये प्राथमिक गटातून पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल च्या शाफे खान शोएब खान व ओम जाधव या विद्यार्थ्यांनी बाजी मारत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकवला आहे. या विद्यार्थ्यांचा विज्ञान अध्यापक मंडळाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र भास्कर, तालुका अध्यक्ष सुनील वावगे यांनी पारितोषिक देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांचा शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी सत्कार केला. यावेळी विज्ञान शिक्षक हरिष सौंदळे व रेश्मा शेंडे उपस्थित होते.

## ८ रथाव्दारे मतदार जनजागृती कार्यक्रमास सुरूवात

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात २५ डिसेंबर २०२५ रोजी पासून ८ जनजागृती चित्ररथाव्दारे अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदार जनजागृती कार्यक्रमाचे मनपा उपायुक्त विजय पारतवार यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा जनजागृतिपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून या आगोदर अकोला महानगरपालिकेच्या १२७ कचरा घंटा गाड्यांवर मतदार जनजागृती बाबतचे फलके आणि ध्वनीफीत (जिंगल) लावून संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रात जनजागृती करण्यास सुरूवात झाली असून आजपासून अकोला मनपा प्रशासनाव्दारा फलके आणि ध्वनीफीत (जिंगल) लावून तयार करण्यात आलेले ८ चित्ररथव्दारे मतदार जनजागृती करण्यात येणार आहे.

# रब्बी हंगाम ई पीक पाहणी; शेतकऱ्यांनी २४ जानेवारीपूर्वी नोंदणी करावी

प्रतिनिधी ३० डिसेंबर

◆ जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अकोला :** रब्बी हंगाम ई पीक पाहणीची सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६पूर्वी आपल्या पिकांची नोंदणी फोनद्वारे करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा निमा यांनी केले आहे.

आतापर्यंत अत्यल्प नोंदणी

ई- पीक पाहणीत शेतक-यांनी स्वत: ७/१२ वर पीक पेरा अँड्रॉइड फोनव्दारे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेवटची तारीख २४ जानेवारी आहे. अकोला जिल्ह्यात एकूण ३ लक्ष ८१ हजार ७१४ ओनर प्लॉटची संख्या असून, त्यापैकी १२ हजार ७५३ ओनर प्लॉटची नोंदणी झाली आहे. हे प्रमाण ३.३४ टक्के इतकेच आहे.

अकोला जिल्ह्यात डिजिटल क्रॉपसर्व्हेअंतर्गत ई पीक पाहणीची नोंदणी १५ हजार ७७६.४३ हे.क्षेत्रावर रब्बी पिकाची नोंद झाली असून, उर्वरित क्षेत्रावर नोंदणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी ॲपद्वारे पीकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पीक पाहणीची नोंदणी ‘ई पीक पाहणी व्हर्जन ४.०.५’ या मोबाईल ॲपद्वारे होते. ते प्ले स्टोअरला उपलब्ध आहे. ई पीक पाहणी ॲपद्वारे शेत बांधावर जावुन पिकांची नोंदणी करून माहिती अपलोड करावी.

**अडचण आल्यास स्थानिक कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी**

त्यासाठी संबंधित शेतक-याजवळ मोबाईल उपलब्ध नसल्यास अथवा हाताळता येत नसल्यास, संबंधित गावाचे ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल तसेच संबंधित गावात नियुक्त केलेले सहायक यांची मदत घेऊन आपल्या पीकांची नोंदणी ई पिक पाहणी ॲप व्दारे करून घेण्यात यावी. सदर ॲप विषयी काही अडचण असल्यास संबंधीत गावाचे ग्राम महसूल अधिकारी तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर, आपल्या गावातील डीसीएसकरिता नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. ऑनलाईन नोंद केल्यावर ४८ तासानंतर त्या नोंदीसह अद्ययावत सातबारा उपलब्ध होईल.

ई पीक पाहणीद्वारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या ७/१२ वर पीक पेरा कोरा राहील. त्यामुळे पीक विमा, व इतर शासकीय अनुदान व लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होते. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीबाबत पीक विमा मिळण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या पिकांची नोंदणी करून घेण्यात यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५

# मोटारसायकल चोरट्याचा पर्दाफाश

## ९ दुचाकींसह पाच लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी ३० डिसेंबर



**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यातून तसेच लगतच्या जिल्ह्यांतून मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्याच्याकडून तब्बल नऊ दुचाकी जप्त केल्या आहेत. या जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ५ लाख २० हजार रुपये असल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिली.

दिनांक २८ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवतमाळ उपविभागात घरफोडी, जबरी चोरी व मोटारसायकल चोरीसारख्या उघड गुन्ह्यांच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना मुखबिराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. प्रविण गणेश राउत (वय ३९, रा. दाते कॉलेजजवळ, बेलिजा समोर, यवतमाळ) हा शहरात व आजूबाजूच्या परिसरात चोरीच्या दुचाकी विक्रीच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने पोस्टल ग्राउंड परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

प्राथमिक चौकशीत आरोपीने बाभूळगाव येथील कालव्याच्या पुलाजवळून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. अधिक चौकशीत त्याने यवतमाळ जिल्ह्यासह बुलढाणा, वर्धा, वाशिम, हिंगोली व नागपूर जिल्ह्यांतून दुचाकी चोरी करून त्या आपल्या घराजवळ लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विविध ठिकाणांहून हिरो होंडा स्प्लेंडर, होंडा युनिकॉर्न, ॲक्टिव्हा, बजाज प्लॅटिना, हिरो शाईन अशा एकूण नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या.

जप्त केलेल्या दुचाकींमध्ये काही वाहनांचे चेसिस क्रमांक खोडलेले असल्याचेही आढळून आले आहे. आरोपीस पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन बाभूळगाव यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंतास व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे यांच्यासह पथकातील अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीपणे पार पाडली.

# खून, बलात्कार व स्ट्रीट क्राइममध्ये मोठी घट

## पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी ३० डिसेंबर



**यवतमाळ** : जिल्ह्यात सन २०२५ या वर्षात पोलीस प्रशासनाने राबविलेल्या कठोर व प्रभावी उपाययोजनांमुळे खून, महिलांविरोधातील गुन्हे तसेच स्ट्रीट क्राइममध्ये लक्षणीय घट झाल्याचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्पष्ट केले. दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी वर्षभरातील गुन्हेगारीचा सविस्तर आढावा सादर केला.

सन २०२४ मध्ये सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रलंबित प्रमाण २३ टक्के होते. मात्र सन २०२५ मध्ये हे प्रमाण घटून ७ टक्क्यांवर आले आहे. शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांमध्येही मागील वर्षाच्या तुलनेत १९.६० टक्क्यांनी घट झाल्याची माहिती देण्यात आली.

महिलांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन प्रस्थान' या विशेष मोहिमेमुळे बलात्कार व विनयभंगासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये मोठी घट नोंदविण्यात आली आहे. कम्युनिटी पोलिसिंग, प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई, तडीपार, एमपीडीए आदी उपाययोजनांमुळे खुनाचा प्रयत्न व इतर दुखापतीचे गुन्हेही नियंत्रणात आले आहेत.

मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये ९ टक्क्यांनी घट झाली आहे. फुटपॅट्रोलिंग, रात्रगस्त आणि सराईत गुन्हेगारांवर केलेल्या कारवाईमुळे जबरी चोरीसारख्या स्ट्रीट क्राइममध्ये ४१ गुन्ह्यांनी घट झाली असून चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांमध्येही लक्षणीय घट झाल्याचे एसपी चिंता यांनी सांगितले. सायबर जनजागृती कार्यक्रमांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्येही घट झाली आहे. संघटित गुन्हेगारीविरोधात मोक्का अंतर्गत ३१ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत चार टोळ्यांमधील २५ आरोपींवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. अंमली पदार्थप्रकरणी ५२ आरोपींवर कारवाई करून सुमारे ४८ लाख रुपयांचा गांजा व एमडी प्रकारचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. शस्त्र अधिनियमान्वये अवैध अग्निशस्त्र व शस्त्र प्रकरणी मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध गुटखा व वाळू उपशावरही कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, ऑपरेशन शोध मोहिमेअंतर्गत हरविलेल्या महिला व पुरुषांचा मोठ्या प्रमाणात शोध घेण्यात पोलीस प्रशासनाला यश आले आहे. सन २०२५ मध्ये एकूण ३०३५ हरविलेल्यांपैकी २३९६ जणांचा शोध लागला असून मिळून येणे बाकी असलेल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. एकंदरीत वर्षभरात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यात पोलीस प्रशासन यशस्वी ठरले असून जनतेच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाल्याचे एसपी कुमार चिंता यांनी स्पष्ट केले.

# महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक समितीत सविता चंद्रे

प्रतिनिधी ३० डिसेंबर



**उमरखेड** : महाराजा यशवंतराव होळकर प्रथम यांच्या 227 व्या राज्याभिषेक महोत्सवाचे आयोजन किल्ले वाफगाव, जिल्हा पुणे येथे करण्यात आले आहे. या महोत्सव समितीच्या कार्यकारिणीत राज्य महिला प्रतिनिधी म्हणून ढाणकी येथील पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्या सविता चंद्रे यांची निवड करण्यात आली आहे.

प्रमुख राज्याभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष श्रीमंत भूषण सिंह राजे होळकर यांच्या स्वाक्षरीचे निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे.

सविता चंद्रे या २०१६ पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. त्या नारीशक्ती बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष असून नारीशक्ती न्यूज चॅनलच्या संपादक आहेत. तसेच धनगर समाज युवा मल्हार सेनेच्या युवती प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांनी सकल धनगर समाजातील मेंढपाळांच्या विविध समस्या हिवाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडल्या आहेत.

# पिकअप वाहन जप्त

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**पांढरकवडा** : पांढरकवडा ते केळापूर टोल नाक्यादरम्यान अवैध रेती वाहतुकीवर महसूल विभागाने कारवाई केली आहे. मंडळ अधिकारी अमोल यादवराव गुधाणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी वसीम खान पठाण (रा. पांढरकवडा) हा पिकअप वाहन (क्र. एम एच ३७ एए ३११७) मधून विनापरवाना अर्धा ब्रास रेतीची वाहतूक करताना आढळला. जप्त केलेल्या रेतीची ६,००० रुपये आहे. पांढरकवडा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# जि. प. शेष निधीतील कामांचा दर्जा संशयास्पद

## पंचायत समिती, जि. प. बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**उमरखेड** : उमरखेड येथील पंचायत समिती व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या इमारतींमध्ये जि. प. शेष निधीतून सुरू असलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. पंचायत समितीला सुमारे १२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून या निधीतून छतावर तीन पत्रे बसविणे तसेच गट्टू व फरशी बसविण्याची कामे सुरू आहेत. मात्र, ही कामे अंदाजपत्रकानुसार न होता बोगस पद्धतीने होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, ज्या कार्यालयात गटविकास अधिकारी स्वतः बसतात, त्या ठिकाणीच निकृष्ट दर्जाचे काम सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. तीन पत्रे बसविताना अंदाजपत्रकानुसार आवश्यक असलेली जाडी न ठेवता कमी प्रतीचे साहित्य वापरण्यात आल्याचे सकृतदर्शनी आढळून येत आहे. त्यामुळे ठेकेदार आणि संबंधित अधिकारी संगनमताने काम उरकून निधी लाटण्याचा प्रयत्न करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

तसेच, जि. प. बांधकाम विभागाच्या कार्यालयात गट्टू व फरशी बसविण्याचे काम सुरू असून, अंदाजपत्रकानुसार सहा इंच जाडीचा सिमेंट काँक्रिट बेड देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात दोन इंचही जाडी नसल्याचे दिसून येते. आतल्या कार्यालयात बसविलेली फरशी सध्या फुटण्याच्या अवस्थेत असून कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



तीन पत्र्यांच्या कामात आवश्यक असलेले लोखंडी अँगल न वापरता, जुन्याच लाकडी राफ्टरवर पत्रे बसविण्यात आल्याचा आरोप असून, त्यामुळे संपूर्ण काम असुरक्षित व निकृष्ट दर्जाचे ठरत आहे. अशा प्रकारे बोगस कामे उरकण्यात येत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन गुणवत्तानियंत्रक व वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराची देयके थांबवावीत, अशी जोरदार मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

# तरुणाचा आगीत होरपळून मृत्यू

## थंडीपासून बचावासाठी पेटवलेली चूल ठरली काळ

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**यवतमाळ** : थंडीपासून बचावासाठी घरातच चूल पेटवल्याने अचानक आग भडकली आणि या आगीत होरपळून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शहरातील बुटले लेआऊट, पिंपळगाव येथे सोमवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास घडली.

मनिष सदाशिव नागेश्वर (वय ३७, रा. बुटले लेआऊट, पिंपळगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. मनिष हा त्याची आई प्रेमिला सदाशिव नागेश्वर यांच्यासह राजू पाचेकर यांच्या घरी भाड्याने वास्तव्यास होता. रविवारी सायंकाळी मनिष व त्याच्या आईमध्ये वाद झाल्याने आई शेजारी राहणाऱ्या



महिलेच्या घरी गेली होती. त्यामुळे मनिष घरात एकटाच होता.

रात्री थंडीपासून बचावासाठी मनिषने घरात शेकोटी पेटवली होती. मात्र, याचदरम्यान अचानक आग लागली आणि ती झपाट्याने पसरली. या आगीत मनिष होरपळून मरण पावला. घटनेची माहिती रात्री ३.२० वाजताच्या सुमारास नगर परिषद अग्निशमन दलाचे अधिकारी विनोद खरात यांना मिळताच दोन अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाली. सुमारे एक तास पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत घर पूर्णपणे जळून खाक झाले असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नगर परिषद अग्निशमन दलाचे वाहनचालक प्रमोद तिडके, नितीन जगताप, विपीन राहंडाले तसेच फायरमन अनुराग कुरचुले, सूरज राठोड, धीरज राठोड, सागर वाढई आणि निलेश भिसेन यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# उमरखेड येथे डायलिसिस सेंटरला आग

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**उमरखेड** : येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस सेंटरमध्ये मंगळवारी दुपारी सुमारे दोनच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. घटनेच्या वेळी सेंटरमध्ये आठ रुग्ण उपचार घेत होते. मात्र, कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे सर्व रुग्णांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असून मोठा अनर्थ टळला.

डायलिसिस सेंटरमध्ये एमसीबी बोर्डाजवळ अचानक स्पार्किंग होऊन आग लागली. त्यामुळे काही क्षणांतच धुराचे लोट पसरले आणि रुग्णांमध्ये घबराट निर्माण झाली. यावेळी डायलिसिस इन्चार्ज अनंत खोब्रागडे, टेक्निशियन सोयब अहमद, परिचारिका संगीता कदम, तसेच ज्ञानेश्वर वानखेडे, सारंग भोयर आणि अनिरुद्ध हिंगाडे यांनी तत्काळ परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सेंटरच्या खिडक्यांची जाळी तोडली व त्यातून रुग्णांना बाहेर काढले. दुसरीकडे, काही कर्मचाऱ्यांनी अग्निशामक सिलिंडरच्या मदतीने आग आटोक्यात आणली.

घटनेच्या वेळी उत्तम गेमा जाधव, पार्वती राठोड, कैलास कुबडे, लक्ष्मण जाधव, प्रकाश आलट, सय्यद मुल्ला, मंचक कदम व सादिक शेख हे रुग्ण उपचार घेत होते. सर्व रुग्णांना सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांच्यावर उपचार सुरू ठेवण्यात आले. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांनी कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

दरम्यान, उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस सेंटरचे काही दिवसांपूर्वीच उद्घाटन होऊन ते कार्यान्वित झाले असले, तरी आवश्यक त्या सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचा आरोप नातेवाइकांकडून करण्यात आला. "हे सेंटर रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी आहे की धोक्यात घालण्यासाठी?" अशा संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त होत होत्या.

आग लागल्यानंतर तातडीने वीज वितरण कार्यालयाशी संपर्क साधून वीजपुरवठा बंद करण्याची विनंती करण्यात आली. मात्र, "तुम्हीच डीपीवर जाऊन लाईन बंद करा," असे बेजबाबदार उत्तर मिळाल्याचा आरोप करण्यात आला. दोनदा फोन केल्यानंतर अखेर संबंधित भागातील वीजपुरवठा बंद करण्यात आला. एवढ्या गंभीर घटनेतही वीज वितरण कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा समोर आला असल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# गाडगेबाबांच्या विचारातून फुले-आंबेडकर समजले तर परिवर्तन शक्य : अनिल शिंदे

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**यवतमाळ** : राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या विज्ञानवादी आणि मानवतावादी विचारांचा स्वीकार करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणे शक्य आहे. गाडगेबाबांच्या विचारांच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा बहुजन समाजाने आत्मसात केली, तर समाजाचे एकत्रीकरण वेगाने होईल, असे मत अनिल शिंदे (अकोला) यांनी व्यक्त केले.

मानवतावादी संत गाडगेबाबा विचार मंच, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित 'गाडगेबाबांचा विज्ञानवादी संदेश आणि आजचा समाज' या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते.

अनिल शिंदे यांनी गाडगेबाबांच्या विचारधारेचे महत्त्व विशद करताना सांगितले की, माणसा-माणसात भेद निर्माण करणाऱ्या रूढी-परंपरांपासून दूर राहण्याचा संदेश गाडगेबाबांनी दिला. "गाडगेबाबा म्हणजे विषमतावादी व्यवस्थेवर प्रहार करणारे पुरोगामी विचारांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्या विचारातून फुले-आंबेडकरी विचारधारा समजून घेतल्यास बहुजन समाजाच्या एकीकरणासाठी नवी दिशा मिळू शकते," असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिंदे यांनी धोबी समाजावर होत असलेल्या अन्यायाबाबतही भाष्य केले. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी धोबी समाज अनुसूचित जाती (SC) प्रवर्गात होता; मात्र राज्यनिर्मितीनंतर त्याचा समावेश इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गात करण्यात आला, जो अन्यायकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशातील १८ राज्यांमध्ये धोबी समाज अनुसूचित जाती प्रवर्गात असल्याने, महाराष्ट्रातही त्यांचा समावेश पुन्हा SC प्रवर्गात करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. यासाठी बहुजन समाजाने एकत्र येऊन संघर्ष करावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वभाषिक धोबी महासंघ, विदर्भ विभागाचे उपाध्यक्ष चंद्रशेखर केळतकर होते.

# महागावात रेती तस्करांचा उच्छाद!

## हिवरा संगमच्या शेतकऱ्याची न्यायासाठी प्रशासनाकडे धाव; उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**महागाव** : तालुक्यातील हिवरा संगम परिसरात पूस व पैनगंगा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उत्खनन सुरू असून, यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

हिवरा संगम येथील शेतकरी अविनाश लक्ष्मण नरवाडे यांनी रेती तस्करांच्या मनमानीविरोधात ठाणेदार व तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सात दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास थेट उच्च न्यायालय किंवा लोकायुक्तांकडे जाण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



जिल्ह्यात अद्याप एकाही रेती घाटाचा अधिकृत लिलाव झालेला नसताना, हिवरा संगम परिसरात रात्रीच्या वेळी सर्रास रेतीची चोरी सुरू आहे. नरवाडे यांचे शेत पूस नदीच्या काठावर असून, रेती तस्करांनी त्यांच्या शेतातूनच जड वाहनांसाठी अनधिकृत रस्ता तयार केला आहे.

या ओव्हरलोड वाहनांमुळे शेतातील सिंचनाची पाईपलाईन वारंवार फुटत असून, मोठ्या आर्थिक नुकसानीसह पिकांचेही नुकसान होत आहे.

या भागात रेती तस्करीने संघटित गुन्हेगारीचे स्वरूप धारण केले आहे. रात्रीच्या वेळी भरधाव वाहने धावत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विद्युत वाहिन्या तुटण्याचे प्रकार घडत असून, शेतकऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. तस्करांना विरोध केल्यास धमकावण्यात येत असल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

> "मी प्रशासनाला सात दिवसांचा अवधी दिला आहे. या काळात ठोस कारवाई झाली नाही, तर न्यायासाठी उच्च न्यायालय किंवा लोकायुक्तांकडे दाद मागेन. त्यानंतर होणाऱ्या परिणामांना प्रशासन जबाबदार राहील."
> - अविनाश लक्ष्मण नरवाडे, पीडित शेतकरी

विशेष म्हणजे, नरवाडे यांची दीड वर्षांपूर्वी चोरी झालेली 'पिकअप' गाडी अद्याप सापडलेली नाही. उदरनिर्वाहासाठी शेतीकडे वळलेल्या नरवाडे यांना आता रेती तस्करांकडून मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने, "प्रशासनातील काही अधिकारी या अवैध व्यवसायात सहभागी आहेत का?" असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

- नदीपात्र व शिवारात तात्काळ विशेष भरारी पथक नियुक्त करावे, अवैध रेती वाहतूक करणारी वाहने जप्त करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, शेतातून होणारी अनधिकृत वाहतूक त्वरित थांबवावी, झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून भरपाई द्यावी.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत स्टुडंट्स वेलफेअर स्कूलचे सुवर्णयश

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**उमरखेड** : हिंगोली येथे नुकत्याच पार पडलेल्या ८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धा २०२५ मध्ये स्टुडंट्स वेलफेअर इंग्लिश मिडीयम स्कूल, दहागाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

या स्पर्धेत ईश्वरी अविनाश जाधव हिने ११ वर्षे वयोगटातील कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक मिळवले. तिच्या आत्मविश्वासपूर्ण व तांत्रिक खेळाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक झाले. तसेच श्रीनय शशिकांत आकरे याने १० वर्षे वयोगटातील कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक पटकावले. उत्कृष्ट तंत्र आणि चपळतेच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.



याच स्पर्धेत गायत्री शशिकांत आकरे हिने अवघ्या ८ वर्षे वयोगटात कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक पटकावले. लहान वयात मिळवलेले हे यश प्रेरणादायी ठरले आहे. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष दर्शन अग्रवाल, उपाध्यक्ष नारायण वड्डे, सचिव नितीन भुतडा, सपना अग्रवाल, संस्थेचे व्यवस्थापक आशिष लासीनकर, मुख्याध्यापक एम. पी. कदम व मुख्याध्यापिका पल्लवी पराते यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या मेहनत, सातत्यपूर्ण सराव व शिस्तीचे त्यांनी विशेष कौतुक करत त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेला नवी दिशा मिळाली असून, भविष्यात हे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५

# बोगस कागदपत्रांची कहाणी, बनावट मोका तपासणी!

ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..


गुरूवार दि.२४ जुलै २०२५ — सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express

सरकारी जागेतील अतिक्रमित विहीर खाजगी सात- बारावरून हटावा

खाजगी व सरकारी जमिनीतील घुसखोरी थांबवा!

'पोकरा' योजनेत घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा

*अनुदान लाटण्यासाठी 'बोगस' बिले सादर * रिसोड तालुक्यात काम अपूर्ण, अनुदान घेतले पूर्ण *पोकरातील सावळागोंधळ चव्हाट्यावर

अशी होऊ शकते चौकशी आणि कारवाई

गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५ — सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express

कृषी सहायकाची मर्जी, अनुदान वाटप फर्जी!

रविवार दि.२४ ऑगस्ट २०२५ — सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express

कृषी अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती, कामाची कागदावरच गती...

कुंपनानेच खाल्ली शेती, योजनेची माती

सोमवार दि.२५ ऑगस्ट २०२५ — सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express

पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...

भ्रष्टाचाराचे सत्र, खोटे पात्र, खरे अपात्र!

*खऱ्या लाभार्थ्यांना ठेवले वंचित * अधिकाऱ्यांनी संपत्ती केली संचित

गुरूवार दि. २५ डिसेंबर २०२५

पोखरा योजनेत फसवेगिरी, गावठाण हद्दीत घुसखोरी!

*तक्रार दाखल, प्रशासनाने घेतली दाखल * चौकशी समिती करणार तपास

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम — शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५

पोकरातील भ्रष्टाचातील धडकी, पत्रकाराच्या परिवारास... जीवे मारण्याची धमकी!

*रिसोड पोलीसात तक्रार दाखल, कारवाई करण्याची मागणी * पोकरातील भ्रष्टाचाराची तालुक्यात खळबळ

भ्रष्टअधिकाऱ्यांची लाभार्थ्यांना सुट, स्व-दानासाठी अनुदानाची लुट!

ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..

*पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले * चौकशी व तक्रारीतून धरले ...

एकाच कुटुंबात दिलेल्या लाखों रुपयांच्या अनुदानाचा गोषवारा.

सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५

ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..

अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपनानेच खाली शेती...

पोकरा योजनेची माती!

* पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी गरज * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर

## *पोकरा योजनेतील घोटाळा *अनुदानातून पैसा केला गोळा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत ( पोकरा ) शेततळे, शेडनेट, अवजारे बँक आणि कागदोपत्री दाखवलेल्या फळबाग अनुदानात मोठा गैरप्रकार अनेक जिल्ह्यातून समोर आले आहेत. जागतिक बँकेचे अर्थसाह्य असलेल्या या योजनेत अपात्र लाभार्थ्यांना, खोट्या कागदपत्रांच्या आधारे आणि बनावट मोका तपासणी अहवालातून नियमबाह्य अनुदान वाटप केल्याचे सिद्ध झाले आहे. याच धर्तीवर आता वाशिम जिल्ह्यातून तक्रारी पुढे येत आहेत. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील तक्रारी नंतर संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून चौकशी समिती कसा तपास करते याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.**





### अकोल्यात अशी झाली होती चौकशी ...

अकोला जिल्ह्यातील पोकरा घोटाळा राज्यभर गाजला होता. अखेर या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने कसून चौकशी केली असता तब्बल ११६ गटांमध्ये कृषी अवजारे खरेदीत गैरव्यहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यात लाभार्थींकडे मंजुरी पेक्षा कमी किंवा एकही अवजारे नसल्याची माहिती चौकशीनंतर उघडकीस आली होती. तसेच ईतर काही कृषी अवजारे खरेदी न करताच कागदोपत्री दाखवून अनुदान लाटले असल्याचे सिद्ध झाले आहे. तर काही ठिकाणी अवजारे बँक शेड उभारण्याआधीच अवजारे देण्याची देयके जोडून अनुदान वितरित केल्याचे सिद्ध झाले आहे. तर मर्जीतल्या लोकांना एकाच योजनेचा दोन वेळा लाभ दिला असल्याची माहिती सुद्धा उघड झाली आहे. अशाच प्रकारे वाशिम जिल्ह्यातील तक्रारीची सखोल व पारदर्शक चौकशी झाली तर अनेक गैरव्यवहार व अवैध प्रकार चव्हाट्यावर येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा ही योजना राज्यातील शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. हवामान बदलाच्या नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना खुप महत्वाकांक्षी ठरेल या स्तुत्य हेतूने शासनाने ही योजना सुरु केली आहे. मात्र कृषी विभागाच्या काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी या योजनेची वाट लावली असल्याचे वास्तव समोर येत आहे. पोकरा भाग -१ मधे बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात अवजाराच्या अनुदानात त्रुटी आढळल्या आहेत. तर फळबाग सारख्या महत्वाच्या योजनेत तपासणी न करताच कागदोपत्री मोका तपासणी अहवाल तयार करून लाखों रुपयांचे अनुदान दिले असल्याचे सिद्ध झाले आहे. एव्हढेच नव्हे; तर जालना जिल्ह्यात शेडनेट उभारणीत मोठा गैरप्रकार झाल्याचे समोर आले असून यात तब्बल २०० कोटीपेक्षा जास्त घोटाळा असल्याचा आरोप आहे. तीच परिस्थिती वाशिम जिल्ह्यात सुद्धा असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात रिसोड तालुका अग्रस्थानी असल्याचे बोलले जात आहे. शेलुखडसे येथील तक्रार दाखल झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने प्राथमिक तपासणीला सुरुवात झाली असून तपास अधिकारी संतोष वाळके यांनी शेलुखडसे येथील गट नंबर ६३३ मधील कथित फळबाग व वादग्रस्त विहीर आणि तक्रारीतील ईतर मुद्द्यांची प्राथमिक पाहणी केली आहे. पुढील तपासणी तंत्र अधिकारी करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणामुळे रिसोड तालुक्यात खळबळ उडाली असून लवकरच मोप आणि भर जहाँगीर कृषी मंडळातील पोकरा भाग -१ मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावात हीच परिस्थिती असल्याचे बोलले जात आहे. सदर योजनेत समाविष्ट असलेल्या अनेक गावात पात्र लाभार्थ्यांना डावलून मर्जीतल्या लाभार्थ्यांना एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान देण्यात आले असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. परिणामी आता या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीत मोठ्या प्रमाणात बोगस अनुदान देण्यात आले असल्याचे पुरावे समोर येत आहेत. या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून सखोल आणि पारदर्शक चौकशी केली तर मोठे घबाड उघड होणार असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे.

## थोडक्यात

### चेतन इंगोले यांची सावता परिषद वाशिम शहराध्यक्षपदी निवड



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सावता परिषद वाशिम शहराध्यक्षपदी चेतन संतोषराव इंगोले यांची एकमताने निवड करण्यात आली. सातत्यपूर्ण सामाजिक कार्य आणि संघटनात्मक कामाच्या अनुभवाच्या जोरावर त्यांची ही निवड झाली आहे.या वेळी उपशहराध्यक्षपदी अविनाश जितकर यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच संघटनेच्या विचारधारेवर विश्वास ठेवत मोठ्या संख्येने महिला व पुरुषांनी सावता परिषदेत प्रवेश केला.निवडीनंतर बोलताना शहराध्यक्ष चेतन इंगोले म्हणाले की, सावता परिषदेच्या माध्यमातून समाज संघटित करणे, शिक्षण, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि युवकांना नेतृत्वाच्या संधी देणे हे संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट राहील.हा कार्यक्रम सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रंजनाताई परिसकर, रिसोड तालुका महिला आघाडी अध्यक्ष रेखाताई जाहिरव, जिल्हा उपाध्यक्ष रवीभाऊ वानखडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रा. विजय गायकवाड यांना आचार्य पदवी बहाल



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

येथील स्व. पुष्पदेवी पाटील महाविद्यालयाचे प्रा. विजय गायकवाड यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी मिळाली आहे. त्यानिमित्त येथील समृद्धी क्लासेसतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रा.सौ. शिवगंगा तांबिले यांनी व सत्कारमूर्ती प्रा. बोरकर यांनी मार्गदर्शन केले. रिसोड येथील स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयचे ग्रंथालय विभागप्रमुख(ग्रं) प्रा विजय शशिकला रामराव गायकवाड यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी मिळाल्याबद्दल समृद्धी क्लासेस रिसोडच्या संचालिका प्रो प्रा सौ शिवगंगा देविदास तांबिले/पठाडे यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा पठाडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन करताना म्हणाल्या की 'प्रा डॉ गायकवाड सर यांनी केलेली पीएचडी ही कठीण मेहनतीचे फळ असुन विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून बोध घ्यावा. सतत अभ्यासात गुंतून राहिल्यास येणारे फळ हे निश्चितच परिपक्व असेल. यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनात जास्तीत जास्त वेळ खर्च करावा असे त्या म्हणाल्या. यावेळी मंचावर प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा देविदास तांबीले, शिक्षिका सौ सपना राज खरात/काकडे उपस्थित होत्या. याबरोबरच क्लासेसच्या इतर शिक्षिकेमध्ये वैष्णवी खोलगडे, माधवी देशमुख, स्नेहल नंदकुले, गायत्री खरात, ऋतुजा खरात व क्लासेस चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हक्काचा पैसा नागरिकांच्या दारात ; प्रोक्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण - जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

हक्क न सांगितलेल्या संपत्तीच्या वितरणासाठी आजचे विशेष शिबिराच्या माध्यमातून प्रशासन स्वतः नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांचा हक्काचा पैसा मिळवून देत आहे, हे प्रोक्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

आर्थिक क्षेत्रातील दावा न केलेल्या मालमत्तेचे कार्यक्षम व जलद वितरण करण्यासाठी आयोजित विशेष मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय (भारत सरकार) यांच्या पुढाकाराने हॉटेल दानीश एम्पायर येथे या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी योगेश क्षिरसागर, आरसेटी संचालक धनाजी बोईले, नागपूर आरबीआयचे प्रबंधक महेश थूल, एसबीआय मुख्य शाखेचे प्रबंधक मोहित कुमार यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी, खातेदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले,अनेक वर्षांपासून बँकेत पडून असलेल्या निधीच्या अनुषंगाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, आरबीआयच्या ध्येय-



धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, यासाठी जिल्हा अग्रणी बँक महत्त्वाची भूमिका बजावत आहे.या उपक्रमात इतर बँकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी यावेळी केले. तसेच अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना मिळत असून, पात्र नागरिकांनी त्यांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांची आर्थिक साक्षरता वाढावी यासाठी अशा प्रकारची शिबिरे सातत्याने आयोजित करावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिबिराला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी उपस्थितांचे विशेष कौतुक केले. शिबिराचे प्रास्ताविक एलडीएम यशवीर कुमार यांनी केले. त्यांनी शिबिराची सविस्तर माहिती देताना सांगितले की, जिल्ह्यातील सुमारे १८ कोटी रुपयांची दावा न केलेली संपत्ती आरबीआयकडे जमा आहे. आजच्या शिबीरात १५७ खातेदारांना १.२३ कोटी रुपये रक्कम आतापर्यंत वितरित करण्यात आली असून जवळपास १६.७० कोटी रुपये रक्कम अजून आरबीयकडे जमा आहे. संबंधित बँक खात्यांची यादी बँकांच्या नोटीस बोर्डवर तसेच ग्रामपंचायत स्तरावर अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांनी ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी पंकज दिवनाले यांनी मनोगत व्यक्त करत, या विशेष शिबिरासाठी बँकांनी पुढाकार घेऊन व्यापक जनजागृती केल्याचे नमूद केले.

जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर यांनी विविध बँकांच्या स्टॉलला भेट देत पाहणी केली. शिबिराच्या निमित्ताने बँकांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.यावेळी एसबीआय प्रबंधक मोहित कुमार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत, दावा न केलेल्या संपत्तीबाबत प्रक्रिया, नियम व नागरिकांचे हक्क यांची सविस्तर माहिती दिली.

## कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गत २१ वर्षापासून सामाजीक कार्यकर्ते तरून क्रांती मंचचे जिल्हाअधक्ष निलेश सोमानी व आयुर्वेद तज्ञ डॉ दिपक ढोके यांच्या पुढाकाराने कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब देण्यात आली या वर्षी वैकुंठधामवासी सौ.स्नेहलता पूनमचंद सोमानी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सदर उपक्रम रविवार २८ डिसेंबर रोजी रात्री ८ ते १२ वाजे दरम्यान शहरात राबवण्यात आला.या करीता निलेश सोमानी सौ.भारती सोमानी तेजस सोमानी कु.पुर्वा सोमानी व सोमानी परीवाराने पुढाकार घेतला.स्थानीक बालाजी मंदीर शनीमहाराज मंदीर परीसर छत्रपती शिवाजी महाराज चौक पाटनी चौक अकोला नाका जिल्हा सामान्य रूग्णालय बस स्थानक पुसद नाका रेल्वे स्टेशन



परीसर या ठीकाणी गरजवंतांना मायेची उब देण्यात आली.सदर कार्यक्रम निलेश सोमानी, डॉ दिपक ढोके आयुश ढोके, राजु कलवार, सुनिल जगताप ,राम बोरा, मंगेश बोरा, विरुणु इंगळे, आयुष ढोके,आरूश ढोके तेजस सोमानी यांनी सहभाग घेतला कडाक्याच्या थंडीत अचानक पने मिळालेल्या उबदार ब्लँकेटमुळे अनेकांच्या डोळयात आनंदाश्रु तरळले अनेकांनी आशीर्वाद दिले गत २१ वर्षा पासून शहरामध्ये हा सामाजीक उपक्रम राबवण्यात येत आहे.

## २०२६ : आत्मविश्वास, नेतृत्व आणि प्रगतीचे... सुवर्णवर्ष ठरणार, परिवर्तन घडविणार!

### डॉ. भरत चंदणानी यांचे मत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

२०२६ हे वर्ष ज्योतिषीय दृष्ट्या अत्यंत शुभ आणि परिवर्तन घडवणारे ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ग्रहांचा राजा मानल्या जाणाऱ्या सूर्याच्या प्रभावामुळे हे वर्ष निर्णयक्षमता, नेतृत्व, आरोग्य आणि मान-सन्मान वाढवणारे ठरणार असल्याचे अंकशास्त्र तज्ज्ञ, जोतीष्यचार्य, वास्तुतज्ज्ञ डॉ. भरत चंदणानी यांनी सिटी न्युज सुपरफास्टशी बोलतांना सांगितले.



या वर्षात अनेकांना नवीन संधी मिळणार असून, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून पुढे जाणाऱ्यांसाठी प्रगतीचे दरवाजे खुले होणार आहेत. विशेषतः मूलांक १, १०, १९ व २८ असणाऱ्यांसाठी २०२६ हे वर्ष नवी सुरुवात, यश आणि प्रतिष्ठा देणारे ठरणार आहे.आरोग्याच्या दृष्टीनेही हे वर्ष सकारात्मक असून, शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकडे लक्ष दिल्यास ऊर्जा आणि दीर्घायुष्य लाभेल. तसेच, प्रशासनाच्या माध्यमातून अनेक नव्या धोरणांमुळे सुधारणा व बदल घडून येण्याची शक्यता आहे. ष

२०२६ मध्ये होणारी दोन सूर्यग्रहणे मोठ्या निर्णयांना आणि सकारात्मक बदलांना चालना देतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.दररोज सकाळी सूर्याला अर्घ्य अर्पण केल्यास आत्मविश्वास, आरोग्य आणि सकारात्मकता अधिक वृद्धिंगत होईल. एकूणच, २०२६ हे वर्ष आशा, संधी आणि यशाचे प्रतीक ठरणार असून अनेकांच्या आयुष्यात नवा उज्ज्वल अध्याय लिहिला जाणार आहे.

## कारंजा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर झाडाची कत्तल... अधिकारी हप्ते घेऊन गप्प, कारवाई मात्र ठप्प!

### *एक झाड मोठा व्हायला खूप वर्ष लागतात साहेब *आरामशीन सूर्यास्तानंतरही सुरू

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मोठमोठ्या झाडाची अवैद्य कत्तल होत असून याकडे वन अधिकारी हप्ते घेऊन दुर्लक्ष करत आहे.या अधिकाऱ्यांना वेळोवेळी माहिती देऊन सुद्धा त्यांनी आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही.याचा अर्थ या अधिकाऱ्याचा झाडे तोडणाऱ्या तस्कराशी देवाण-घेवाण झाली आहे.कारंजा शहरात मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाचा माल बिना परवाना (पास) कारंजा शहरात येतो व खुल्या विक्री केल्या जाते,यावर सुद्धा आता पर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही.

आज रोजी महाराष्ट्र शासन झाडे





लावण्यावर व त्याच्या संगोपनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करत आहे.निसर्गामध्ये झाडाला असाधारण महत्त्व आहे. झाले जर जास्त प्रमाणात तोडले गेली तर निसर्गामध्ये असंतुलन निर्माण होणार आहे.त्यामुळे पावसाळ्यामध्ये पावसाचे प्रमाण कमीजास्त होऊन दुष्काळ परिस्थिती सुद्धा निर्माण होऊन शेतकऱ्याला सर्वात मोठा धोका निर्माण होऊ शकतो.पाऊस जर कमी पडला तर शेतात उत्पन्न होणार नाही आणि उत्पन्न जर झाले नाही दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण होउनु शेतकऱ्यासमोर उदरनिर्वाचा प्रश्न निर्माण होईल आणि त्याला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय राहणार नाही.आणि महाराष्ट्रात कारंजा तालुक्यामध्ये सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या आहेत.

एवढा मोठा परिणाम वृक्षतोडीचा होऊ शकतो.शासनाचा झाडे लावण्यावर मोठ्या प्रमाणात होणारा खर्च आणि दुसरीकडे शासनाचेच अधिकारी झाडे तोडणाऱ्यावर कारवाई न करता त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर हप्ते घेत आहे. आणि झाडे तोडणाऱ्या तस्करांना खुलेआम सुट देत आहे.आणि हे अवैध्य वृक्ष तोड ताबडतोब थांबवून कारंजा येथील वनाधिकाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## दादगाव ते पिंपळगाव रस्त्याचा प्रश्न लागला मार्गी!

### आ. सईताई डहाके यांच्या प्रयत्नात यश

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा तालुक्यातील दादगाव ते पिंपळगाव या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर शासनाची मंजुरी मिळाली असून गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आ.सईताई प्रकाश डहाके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागला आहे.

कारंजा सोहळ वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्यामुळे स्थानिक नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात नव्हे तर बाराही महिने रस्त्याची दुरवस्था होत असल्याने



शेतकरी,विद्यार्थी, कामगार तसेच रुग्णवाहिकांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते.या समस्येच्या निराकरणासाठी आ.सईताई प्रकाश डहाके यांनी नागपूर येथे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.तसेच राज्याचे मंत्री ना.गणेशजी नाईक यांची भेट घेऊन रस्त्याच्या मंजुरीसाठी ठोस भूमिका मांडली.वन विभाग व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याने अखेर या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, केवायसीसाठी अखेरचे दोन दिवस

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि आधार प्रमाणीकरण करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत असून, ती तत्काळ पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचे ई केवायसी करून पती अथवा वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोटीतांनी घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी. अंगणवाडी नसल्यास बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अर्जासह कागदपत्रे देऊन शिफारस घ्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

### अकोला पोलीस दलाची २०२५ मध्ये उल्लेखनीय कामगिरी

# गुन्हेगारीवर अंकुश, नागरिक सुरक्षेला प्राधान्य

**पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासह अकोला पोलिसांचे यश**

प्रतिनिधी ३० डिसेंबर





**अकोला :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यात अकोला जिल्हा पोलीस दलाने २०२५ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गुन्ह्यांची उकल, महिला व बालक सुरक्षा, अवैध धंद्यांवर कारवाई आणि तंत्रज्ञानाधारित पोलिसिंग यामुळे नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 'प्रोजेक्ट रक्षा' अंतर्गत पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची तक्रार वेळेत नोंदवून त्यांचे जलद निराकरण करण्यावर भर देण्यात आला. याचबरोबर 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध दारू, अमली पदार्थ, गोवंश तस्करी, जुगार व प्रतिबंधित गुटखा यावर धडक कारवाई करत तब्बल ५.४१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महिला व बालक सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या 'मिशन उडान' मोहिमेमुळे जनजागृती कार्यक्रम, कार्यशाळा, पथनाट्य व रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक संदेश देण्यात आला. महिला विषयक गुन्ह्यांमध्ये १०० टक्के गुन्हे उघडकीस आणून आरोपींना अटक करण्यात पोलीस दलास यश आले आहे. हरवलेले नागरिक व अपहरण प्रकरणांच्या तपासासाठी सुरू करण्यात आलेल्या 'ऑपरेशन शोध' मोहिमेअंतर्गत आतापर्यंत ४०४ महिला, पुरुष व बालकांचा यशस्वी शोध घेण्यात आला आहे. तसेच मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमुळे गुन्हे तपास अधिक वैज्ञानिक, गतिमान आणि परिणामकारक ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे सीसीटीएनएस प्रणालीत अकोला पोलीस दलाने राज्यात सलग चौथ्यांदा अव्वल कामगिरी नोंदवली असून अमरावती परिक्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' मुळे वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींकडील गुन्ह्यांमध्ये ६४ टक्क्यांनी घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. सण-उत्सव, निवडणूक काळ आणि सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान चोख बंदोबस्त ठेवल्याने जिल्ह्यात सर्व सण उत्सव शांततेत पार पडले. वाहतूक विभागाच्या प्रभावी कारवाईमुळे रस्ते अपघात रोखण्यातही यश मिळाले आहे. ३६ व्या विभागीय पोलीस क्रीडा स्पर्धेत अकोला पोलीस दलाला 'जनरल चॅम्पियनशिप' मिळाले.

### महिला सुरक्षेसाठी पोलीस 'दक्ष'

महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अकोला पोलिसांनी २०२५ मध्ये महिलांविषयक दाखल झालेल्या सर्व गुन्ह्यांची १०० टक्के उकल केली आहे. विनयभंग (३१४ केसेस) आणि बलात्कार (१०७ केसेस) यांसारख्या गंभीर प्रकरणांमधील सर्व आरोपींना अटक करून पोलिसांनी पीडितांना न्याय मिळवून दिला आहे. 'मिशन उडान' आणि 'प्रोजेक्ट रक्षा' यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून महिला आणि बालकांमध्ये जनजागृती केली जात आहे. 'ऑपरेशन शोध' अंतर्गत पोलिसांनी ३९५ बेपत्ता व्यक्तींचा आणि ९ अपहरण झालेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या कुटुंबापर्यंत सुखरूप पोहोचवले आहे

### गुन्ह्यांमध्ये ६४ टक्क्यांची मोठी घट !

अकोला पोलीस दलाने राबविलेल्या 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' मुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात ऐतिहासिक यश आले आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींकडून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये तब्बल ६४ टक्के घट झाली असून, या उपक्रमाची दखल आता राष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक अहवालानुसार, २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये एकूण गुन्हेगारीत लक्षणीय घट झाली आहे. मालमत्तेविषयक गुन्ह्यांमध्ये ७७ ने घट झाली असून, एकूण गुन्ह्यांची संख्या ३७८० वरून ३६३० वर आली आहे. विशेष म्हणजे, गंभीर शारीरिक दुखापतीच्या गुन्ह्यांमध्येही ६९ ने घट झाल्याने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढली आहे.

### अंमली पदार्थांच्या तस्करीवर पोलिसांचा 'प्रहार'

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे कंबरडे मोडण्यासाठी पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत धडक कारवाई सुरू केली आहे. अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत २०२४ च्या तुलनेत तिप्पट वाढ झाली आहे. पोलिसांनी यावर्षी ४३ गुन्हे दाखल करून ४.४६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध दारू, गोवंश तस्करी आणि प्रतिबंधित गुटख्यावरही मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून, ५.४१ कोटींचा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. सी.सी.टी.एन.एस. प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अकोला जिल्हा पोलीस दलाने महाराष्ट्र राज्यात चौथा, तर अमरावती परिक्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या तंत्रज्ञानामुळे गुन्हे उघड होण्याचे प्रमाण वाढले असून चोरीला गेलेला १ कोटी ३० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी मूळ मालकांना परत केला आहे.

## एका तिकिटासाठी अनेक दावेदार



**सर्वच पक्षात बंडखोरीचे फुटणार पेव**
**अनेक कार्यकर्त्यांची अपक्ष लढण्याची तयारी**

प्रतिनिधी ३० डिसेंबर

निवडणुकीत तिकीट मिळणार नाही या भीतीने इच्छुकांमध्ये नाराजी कायम आहे. सर्व झोनमध्ये नामांकन प्रक्रियेदरम्यान इच्छुकांनी त्यांच्या पक्षावर संताप व्यक्त करताना पाहिले. सोमवारी सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी अनेक ठिकाणी स्वतंत्र उमेदवारी अर्ज दाखल केले, तर अनेक कार्यकर्त्यांनी घाईघाईने नामांकन पत्र विकत घेतले. मंगळवारी अपक्ष उमेदवार त्यांचे अर्ज दाखल करण्याची अपेक्षा आहे. सोमवारी प्रमुख उमेदवारांनी त्यांचे अर्ज दाखल केले. कडक पोलिस बंदोबस्तात सर्व ६ झोन कार्यालय परिसरात सुरक्षा तपासणी करण्यात आली. मंगळवारी नामांकनासाठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रत्येक झोनमध्ये उमेदवारासोबत फक्त एक व्यक्ती येऊ शकेल. उशिरा रात्रीपर्यंत तहसील कार्यालयासमोर मंगळवारी नामांकन दाखल करण्यासाठी लागणारी कागदपत्रे तयार करण्याची गर्दी दिसून आली.

### फक्त उमेदवारांना प्रवेश दिला जाईल

◆ सर्व ६ झोन कार्यालय परिसराच्या मुख्य प्रवेशद्वारावर कडक सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. या गेटवर पोलिस आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे तपासल्यानंतर आणि फक्त उमेदवारांना आत प्रवेश दिला जात आहे. सर्व झोनमध्ये प्रवेश नाकारल्यामुळे, कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांची गर्दी दिसून येत आहे. सर्व पक्षांकडून निष्ठावंत आणि दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल चर्चा सुरूच होती. सोमवारी, तहसील कार्यालय झोन आणि डाबकी रोड झोनमध्ये सुरक्षा कर्मचारी आणि अनेक कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाचीची परिस्थिती निर्माण झाली होती. सर्व झोन कार्यालयांमध्ये अर्ज पडताळणी आणि कागदपत्रे जोडण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी अनेक टेबल्स लावण्यात आले आहेत. या टेबल्सवरील अर्जांची पडताळणी केल्यानंतरच अर्ज नोंदणीसाठी प्रवेश दिला जात आहे.

### भाजपसह सर्व पक्षांमध्ये असंतोष

◆ यावेळी मोठ्या संख्येने तरुणांनी सत्ताधारी भाजपवर आशा ठेवल्या आहेत. यामुळे भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात अंतर्गत कलह निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करूनही त्यांना शेवटच्या क्षणी तिकीट नाकारण्यात आल्याचा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांनी उमेदवारी न मिळाल्याबद्दल तीव्र असंतोष व्यक्त केला. गेल्या दोन वर्षांपासून बूथ तयार करण्यासाठी, सक्रिय सदस्य तयार करण्यासाठी आणि पदवीधर मतदारांची नोंदणी करण्यासाठी कठोर परिश्रम करूनही त्यांना तिकीट नाकारण्यात आले. अशीच परिस्थिती इतरत्रही पाहायला मिळत आहे. सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये व्यापक संताप आहे.

## अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांमध्ये उत्साह





### ◆ राजकीय घडामोडींना आला वेग

प्रतिनिधी ३० डिसेंबर





**अकोला :** अकोला महापालिका निवडणुकीत मोठाल्या घडामोडी होत आहे. आज सकाळी भाजपात घरवापसी झालेले हरिश आलिमचंदानी यांना प्रभाग पंधरा अ मधून तिकिट मिळाले. हरिश भाई आणि शेकडो समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल केला. अकोला भाजपमध्ये हरिश भाई यांच्यानंतर पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे निलंबित असलेल्या दोघांना भाजपने पुन्हा पक्षात घेतले. प्रतुल हातवळणे आणि ॲड.गिरिश गोखले यांचे पुन्हा पक्षात स्वागत करण्यात आले. ॲड.गिरिश गोखले यांच्या पत्नी डॉ.स्नेहा गोखले यांची उमेदवारी रद्द झाल्याची माहिती आहे. तर आशिष पवित्रकार यांच्याबद्दल पक्षाने काय भूमिका घेतली याची माहिती वृत्तलिहेस्तावर मिळाली नाही.

आज सकाळी काँग्रेस तर्फे चांदनी रवी शिंदे यांनी यंदा पुन्हा अर्ज दाखल केला आहे. भाजपने मोठा धक्का राजेश मिश्रा यांना दिला आहे. करण साहू यांना राजेश मिश्रा यांच्या विरोधात उमेदवारी दिली आहे. राजेश मिश्रा हे नुकतेच शिंदे सेनेत गेले होते. विधानसभा निवडणुकीत राजेश मिश्रा यांनी भाजप उमेदवाराला धक्का दिल्याने मिश्रा यांना पाडण्याचा चंग भाजपाने आखला आहे. उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेतून सागर भारुका यांनी प्रभाग १२ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. मोठी रॅली काढून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भाजपतर्फे प्रभाग १६ मधून सिद्धार्थ उपर्वट, संजय बडोणे यांनी तर प्रभाग १९ माधुरी संजय बडोने, धनंजय धबाले यांनी आदर्श कॉलनी येथे उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रभाग दोन मधून भाजपाने नितीन राऊत आणि शरद तुरकर यांना उमेदवारी दिली आहे. शरद तुरकर यांनी शिवसेनेला जयमहाराष्ट्र करत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजपने शरद तुरकर यांना तिकिट देत इतर पक्षांना धक्का दिला आहे.

प्रभाग क्रमांक सतरा मधून अमोल मोहकार यांनी भाजपतर्फे अर्ज दाखल केला आहे. प्रभाग सतरा मध्ये उमेदवारांत केला भाजपने मोठा बदल. प्रभाग सतरा मध्ये अमोल मोहकार नवा चेहरा समोल आला. प्रभाग सहा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातर्फे मकरंद शशिकांत पाटोळे तर प्रभाग सहा मध्ये क भागातून गिताताई बुंदेले यांनी अर्ज दाखल केला. शिवसेनेने स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला असून प्रभाग सहा अ मध्ये शिंदे सेनेच्या राजश्री निंबाळकर यांनी अर्ज भरला. त्यांनी आज त्यांचा उमदेवारी अर्ज दाखल केला.



### भाजपने येथे केला मोठा बदल

◆ भाजपने दोन उमेदवारांच्या तिकिट कापल्याची ब्रेकिंग न्यूज प्रभाग २० मधून समोर येत आहे. प्रभाग क्रमांक वीस मध्ये सुमनताई गावंडे व विजय इंगळे यांना भाजपने थांबविले आहे. गेल्या निवडणूकीत विजयी झालेले माजी महापौर सुमन गावंडे यांच्यासह विजय इंगळे यांना पक्षाने यंदा उमेदवारी नाकारली आहे. तर प्रभाग वीस मध्ये भाजपने मंगेश झिने, शारदा ढोरे, सोनाली अंधारे आणि विनोद मापारी यांना उमेदवारी दिली आहे. त्याच बरोबर प्रभाग दहा मध्ये सतीश ढगे आणि गोतमारे यांच्या तिकिटावर भाजपने फुली मारली असून या ठिकाणी भाजपने शिवसेनेच्या मंजुषा शेळके यांना पक्षात घेत तिकिट दिले आहे. भाजपने वैशालीताई शेळके, मंजुषाताई शेळके, अनिलभाऊ गरड आणि नव्याने या ठिकाणी नितीन ताकवाले यांना संधी दिली आहे.

### भाजपने दिली नवीन चेहऱ्यांना संधी

◆ भारतीय जनता पक्षाने अनेक माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारली. तसेच नवीन चेहऱ्यांना संधी दिली.

महापालिका निवडणुकीत त्यामुळे बरीच राजकीय उलथापालथ दिसून येत आहे. जे इच्छुक उमेदवार आपली उमेदवारी निश्चित मानत होते त्यांचा पत्ता कटला. तसेच या निवडणुकीत काहींची घरवापसी झाली. विधानसभा निवडणुकीत झालेली नाराजी दूर करण्यात भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठांना यश आलेले दिसते. पक्षांतर्गत बंडाळी थोपवल्याचा लाभ होईल असा विश्वास व्यक्त केला जातो आहे. महापालिका निवडणूकीच्या अनुषंगाने पक्षांतर्गत घडामोडी वेगाने घडत असल्याचे चित्र आहे.



प्रभाग ६ मधून भाजपचे पवन महल्ले यांनी विजय अग्रवाल आणि जयंत मसने यांच्यासह उमेदवारी अर्ज दाखल केला.



भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या संगीता मदन भरगड यांनी प्रभाग १२ क मधून उमेदवारी अर्ज दाखल केला.



भाजपचे सागर शेगोकार आणि प्रशांत जोशी यांनी प्रभाग ३ मधून अर्ज दाखल केला.

## मूर्तिजापूरमध्ये प्रतिबंधीत मुदतबाह्य औषधांचा अवैध साठा हस्तगत

प्रतिनिधी ३० डिसेंबर

**मूर्तिजापूर :** जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या संकल्पनेतून अवैध धंद्यावर कारवाई राबविण्याकरिता ङप्रहारअंतर्गतङआज मोठी कारवाई दरम्यान शहरात अवैध रित्या प्रतिबंधित औषध चा अवैध साठा असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाल्यावरून सिटी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित जाधव, सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल पवार, पोलिस उपनिरीक्षक आशिष शिंदे, नितीन राठोड, ए एस आय नंदू टिकार पोलिस कॉन्स्टेबल सचिन्ॅहृत, कृष्णा चेरमुळे, सचिन दुबे, गजानन खेडकर, ज्ञानेश्वर राणे, पवन बोडखे, व महिला कॉन्स्टेबल रोहिणी शिरभाते यांनी मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक नवीन घरकुल परिसरात २८डिसेंबर रोजी रेड केली असता सदर ठिकाणी शासनाने प्रतिबंध केलेली औषध चां लाखो रुपयाचा मुदतबाह्य साठा आढळून आल्याने सदर प्रकरणी औषध निरीक्षक याचा अहवाल प्राप्त झाल्यावरून सदर प्रकरणी २९डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे प्राप्त माहितीनुसार मनीष विश्वासराव गोतमारे वय ४६औषध निरीक्षक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नवीन घरकुल मध्ये आरोपी जुनेद खान मेहबूब खान वय २९राहणार रोशनपुरा मुर्तिजापूर व एस पी कॉर्पोरेशन यांनी शासनाने प्रतिबंध केलेल्या नायट्रोसन १०ॅ च्या १०००गोळ्या व मुदतबाह्य औषधी अंदाजे किंमत १२६६२०चा अवैधरित्या कोणत्याच प्रकारचा परवाना नसताना साठा करून मानवी आरोग्या वर परिणाम होईल अशा साठा केल्यावरून दोघाविरुध सिटी पोलिस ठाण्यात कलम १२३,२२३,२७८ॅ-ए सहकलम ८(सी)२२(ए) गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनावर परिणाम करणारे पदार्थ (ॅ-ॅ३ॅइ एॅॅण्ऊ)ॅप्हर्ग्ब्स १९८५(सी) औषधी व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४०नुसार कारवाई करण्यात करून पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे याच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल पवार करीत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK